
MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा • ठाणे

व्ही. पी. एम्.
# दिशा

वर्ष अकरावे / अंक २ / जानेवारी २०१०



## संपादकीय

## आत्महत्यांचा वेध

विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्या हा गेल्या काही दिवसांतील चिंतेचा विषय ठरला आहे. आत्महत्यांच्या या घटनांमुळे समाजमनाची अस्वस्थता वाढत चालल्याचे प्रसारमाध्यमांच्या माहितीतून निदर्शनास येत आहे. एखादा रोग निर्माण झाला व त्याची साथ पसरत गेली तर त्यामागील कार्यकारणभाव निदान समजून घेता येऊ शकतो. परंतु या साथी प्रमाणेच आत्महत्येचे जे लोण पसरत चालले आहे ते मती गुंग करणारे आहे. अशा आत्महत्येच्या घटनेनंतर होणाऱ्या पोलीस तपासातून आत्महत्येमागील जी कारणे पुढे येतात ती पाहिल्यावर अशा क्षुल्लक कारणांसाठी आत्महत्या करावयाची भावना मनात येते, याचेच नवल वाटते. अशा घटनांना कोणताही एकच एक घटक कारणीभूत नसतो; तर अनेक घटकांची ती दृश्य फलश्रुती असते.

पौगंडावस्थेची म्हणून जी लक्षणे मानसशास्त्रात सांगितलेली आहेत त्यातील एक लक्षण म्हणजे स्व ओळख पटवण्याची धडपड हे आहे. आपण कोण आहोत याचे उत्तर सापडत नसल्याने भावनावेग असह्य होतो. ''ॲडोलेसन्स : जनरेशन अंडर प्रेशर'' (लेखक कॉंगर, जॉन. प्रकाशक – हार्पर ॲंड रो) या पुस्तकात पौगंडावस्थेची लक्षणे स्पष्ट करण्यात आलेली आहेत. पालकांपासून आपले भावविश्व दुरावण्याचा अनुभव, समवयस्कांचे वाढते आकर्षण, भावनांचा आविष्कार करण्यातील असाहयता व त्यातून होणारा कोंडमारा इत्यादी अनेक लक्षणे या अवस्थेत आढळतात. भावनांचा कोंडमारा झाला, निचरा झाला नाही की एखादे क्षुल्लकसे कारणही सारासार बुद्धी नष्ट करते. अशा क्षुल्लक कारणाची ठिणगी संपूर्ण जीवन उद्‌ध्वस्त करून टाकते.

इंग्रजीत ज्याला 'आयडेंटिटी क्रायसिस' म्हणतात, त्या स्वओळख पटवण्याच्या धडपडीच्या अवस्थेत भावनिक कोंडमारा का होतो हे पाहिले तर असे जाणवते की यामागेही खूप संकुल कारणे आहेत. इलेक्ट्रॉनिक माध्यमांमुळे जग जवळ आल्याच्या वल्गना आपण नेहमी करतो. पण माणसांची मने, एकाच घरातील नातेसंबंधांतील माणसांची मनेही दुरावत चालली आहेत. या गंभीर सामाजिक वास्तवाचा विसर पडत आहे. वयाची वीस पंचवीस वर्षे उलटून गेली की मने निबर होतात. माणसामाणसांतील संवाद संपण्याची खंतही त्या वयात वाटेनाशी होते.

(मुखपृष्ठ क्रमांक २ वर)

(मुखपृष्ठावरून)

संपादकीय

**आत्महत्यांचा वेध**

परंतु पौंगडावस्थेत व्यक्त होणे ही मानसिक गरज असते. त्यासाठी माणूस मैत्रीचा आधार शोधत असतो. हा मैत्रीचा हात पालकांकडून, शिक्षकांकडून, मित्रांकडून मिळाला नाही तर एकटेपणाचा वणवा मनात पेट घेतो. अशा स्थितीत रोजचे ताणतणाव असलेले जीवन तर जगायचे असतेच. पावलोपावली स्पर्धेची जाणीव, पावलोपावली दुसऱ्याशी होणारी तुलना यांतून मग नैराश्य वाढायला लागतं.

स्पर्धा हे या आत्महत्यांमागील एक प्रमुख कारण असल्याचे स्पष्ट होत आहे. कोणी, कुठे, कुणाशी, किती आणि का स्पर्धा करायची याला धारबंद उरलेला नाही. स्पर्धेसाठी कार्यरत राहिले की कामातला आनंद संपतो आणि यांत्रिकपणे कृती घडायला लागतात. 'पुढे जावे', 'यशस्वी व्हावे' असे वाटणे स्वाभाविक आहे. पण त्यासाठी सर्व विधिनिषेध बाजूला सारणे योग्य ठरत नाही. पालकांच्या मनात 'मालकत्वा'ची भावना वाढायला लागल्यामुळे ते आपल्या प्रतिष्ठेसाठी, पैशासाठी अशा स्पर्धांत मुलांना वापरायला लागतात. साम, दाम, दंड, भेद या सर्व मार्गांचा अवलंब ते करायला लागतात. याचा परिणाम अपयशाची भीती आणि त्या भीतीने व्यापलेले मन हे मुलाला छळायला लागते. अपयश आले तर अपमान होईल, आपण बाजूला पडू या भीतीतून मन:शांती ढळते. अशा अशांत मनात मग मृत्यूचे विचार घोंघाळू लागतात.

निरोगी स्पर्धा, निकोप स्पर्धा, या संकल्पना, अपयश हे यशाची पायरी असते यासारखी वाक्ये मग निरर्थक वाटायला लागतात. आपले मालक असणारे 'आई बाबा' काय म्हणतील या भीतीचा ताण असह्य ठरायला लागतो. अशा स्पर्धा माध्यमांचे स्तोम माजण्यापूर्वीच्या काळातही होत्या. परंतु त्या काळात संवाद साधावा अशी माणसेही आजूबाजूला होती. मुलांच्या विकासात अनावश्यक लुडबूड करणारे 'पालकपण' नव्हते. संध्याकाळी भरपूर खेळण्याच्या संधी होत्या. या सामाजिक अभिसरणामुळे अपयशाकडे मोकळेपणाने पाहण्याचा संस्कार होता.


पालक या संस्थेचे अनेक कारणांनी मालकात रूपांतर झाल्यावर अपेक्षांचे ओझे लादण्याचे काम सुरू झाले. आपले अपत्य आणि बालमजूर यांत काही फरक आहे, असे वाटेनासे झाले. मैदाने घटली, माध्यमांनी कंबरेचे सोडून डोक्याला गुंडाळण्याचे उद्योग सुरू केले आणि मग अशा घटनांचे वास्तव गंभीर रूप धारण करू लागले.

यावरचे सर्वच इलाज सर्वांनाच एकदम करता येतील असे नाही. सुजाण पालकत्वासंबंधी अनेक प्रकारची चांगली पुस्तके मराठी इंग्रजीत उपलब्ध आहेत. त्यांचा वापर वाढायला हवा. मुलांशी मैत्री करणे ही फार महत्त्वाची गरज असते. या मैत्री भावनेची झडप उघडली की मनातली वादळे मोकळी व्हायला लागतात. आपल्या पाल्यालाही स्वतंत्र व्यक्तिमत्त्व आहे याची जाणीव त्यासाठी बाळगायला हवी. आईवडील होणे सोपे असते, पालकत्व मात्र आत्मसात करावे लागते हे पटवून घ्यावे लागेल.

सर्व बाबींचे खापर शासनाच्या माथी फोडण्याच्या आपल्या सवयीनुसार या आत्महत्यांना शासनच जबाबदार आहे असे म्हणणारेही पुष्कळ जण आहेत. मात्र यामागील कारणे समजावून घ्यायची असतील तर समाजाने कठोर आत्मपरीक्षण करायला हवे.

समाजामध्ये अनेक मानसिक जडणघडणीच्या व्यक्ती असतात. काही कठोर घाव सहन करू

(पान क्र. ३१ वर)




**वर्ष अकरावे / अंक २/ जानेवारी २०१०**

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १५ वे / अंक ७ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १) | बालशाळेतील शिक्षकाची सृजनशीलता | सुचिता पडळकर | ३ |
| २) | बालशिक्षणातील संगीत व नाट्याचा वापर | सौ. विशाखा देशपांडे | ८ |
| ३) | 'भावसाधना' - संस्कारक्षम निर्मिती | श्री. सुरेंद्र लागू | १० |
| ४) | उपनिषदे - अर्थात् - ब्रह्मविद्या | श्री. शं. बा. मठ | १३ |
| ५) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | १९ |
| ६) | चंचलता | श्री. यशवंत माने | २४ |
| ७) | ग्रंथकल्याणी : कल्याण सार्वजनिक वाचनालयाचा इतिहास (पुस्तक परिचय) | श्री. मोहन पाठक | २६ |
| ८) | सुवर्ण क्षण | | २८ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | ३२ |


या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आवाहन

विद्या प्रसारक मंडळ, ठाणे ही संस्था ठाण्यात गेली ७५ वर्षांहून अधिक काळ शिक्षण क्षेत्रात कार्य करीत आहे. मराठी व इंग्रजी शाळांबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, व्यवस्थापन शाखांची महाविद्यालये, तंत्रनिकेतन व प्रगत अभ्यास केंद्र अशा सर्वांगीण शिक्षणाची सोय संस्थेने केली आहे. पाठ्यपुस्तकीय शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या अंगचे कला, क्रीडा इ. क्षेत्रातील गुण विकसित व्हावेत म्हणून विविध उपक्रम संस्था राबवीत आली आहे. या सर्वांच्या परिणामस्वरूप संस्थेचे विद्यार्थी अभ्यास व अभ्यासेतर परीक्षा व स्पर्धांत उत्तम यश मिळवीत असून संस्थेचे माजी विद्यार्थी समाजात विविध क्षेत्रांत कार्यप्रवण आहेत.

दूरदर्शन, सिनेमे व सवंग नियतकालिके भोगवादी, नीतीहीन संस्कृतीचा प्रसार करण्यात अग्रेसर आहेत. याउलट विधायक, संस्कृतिरक्षक विचार पोचवतील अशी माध्यमे अल्पसंख्य आहेत. संस्कारक्षम विद्यार्थ्यांना, वाचकांना, नागरिकांना वैचारिक खाद्य पुरवावे, त्यांच्यात ईर्षा निर्माण व्हावी व त्यांनी अर्थार्जन व व्यावसायिक यशाबरोबरच सामाजिक कार्य साधावे, या उद्देशाने मंडळाने '**दिशा**' हे नियतकालिक जुलै १९९६ पासून सुरू केले आहे.

**या मासिकाचे वर्गणीदार होऊन, या मासिकात जाहिरात देऊन किंवा लेख पाठवून आपण आमच्या कार्याला हातभार लावावा ही विनंती !** तसेच, आपल्या अमूल्य देणग्या देऊनही आपण दिशासाठी हातभार लावू शकता.

संपादक, दिशा
**विद्या प्रसारक मंडळ,**
नौपाडा, ठाणे – ४०० ६०२
दूरध्वनी : २५४२ ६२७०

**टीप** : वर्गणी /जाहिरात वा देणगीची रक्कम धनादेशाने पाठवावी. धनादेश (चेक) "**विद्या प्रसारक मंडळ A/c दिशा**" या नावाने पाठवावा.

**वार्षिक वर्गणी रु. २५०/–**

अंकाची किरकोळ
विक्रीची किंमत रु. २५/– फक्त.

वर्गणी पाठविताना आपला पूर्ण पत्ता, टपाल सूची क्रमांक (पिनकोड नंबर) व दूरध्वनी क्रमांक कळवावा.

# बालशाळेतील शिक्षकाची सृजनशीलता

*लहान मुलांतील सृजनशीलता जागवायची असेल तर शिक्षकांनी स्वत:तील सृजनशीलता ओळखायला हवी, वाढवायला हवी. याबाबतचे हे अनुभवाधारित चिंतन – संपादक*

वयाच्या सहा वर्षापर्यंतचे शिक्षण म्हणजे बालशिक्षण. सर्वसाधारपणे पहिल्या दोन वर्षांत शारीरिक आणि भाषिक विकासाचा वेग सर्वाधिक असतो. वयाच्या तिसऱ्या वर्षापासून संकल्पना (बोधात्मक) विकास, भावनिक विकास वेग घेतो तर चौथ्या वर्षी मूल जास्त सामाजिक होते, असे मला माझ्या अनुभवातून कळले आहे. याचा अर्थ तीन ते सहा हे वय बौद्धिक विकासाच्या पायाभरणीचे वय आहे असे म्हणता येईल. बौद्धिक विकासाचे अनेक आयाम असतात. निरीक्षण, संकल्पनांचे दृढीकरण, कार्यकरणभाव, तर्क करणे, कल्पना करणे, अंदाज करणे, मोजमाप, सृजनशीलता, प्रश्नांची उकल करणे इत्यादींचा ढोबळमानाने यात समावेश होतो. हे सर्व घटक कधीही सुटेसुटे विकसित होत नसतात तर ते सारेच परपस्परांवर अवलंबून असतात. त्यांच्यात अंत:प्रवाह सुरू असतात. त्यामुळेच शिक्षण एकात्म असते असे म्हटले जाते. वरील मुद्यांपैकी सृजनशीलतेचा विकास याबाबत मी विवेचन करणार आहे.

सृजनशील हा शब्द आता सर्वपरिचित आणि काही प्रमाणत परवलीचा शब्द झाला आहे. ज्ञानाचा स्फोट, वाढती लोकसंख्या, मर्यादित भूमी, बाजार संस्कृतीची रेलचेल, जाहिराती, पाकशास्त्र, बदलती रहाणी, बदलत्या फॅशन्स, कलेची वाटचाल, तंत्रज्ञान इ. या साऱ्यांसाठी माणसातीली 'सृजनशीलता' महत्त्वाची ठरत आहे. मूल सृजनशील असायला हवे, असे नेहमी म्हटले जाते पण सृजनशीलता म्हणजे नेमके काय?

सृजन या शब्दाचा अर्थ नवीन सुचण्याची शक्ती. माझ्या विचारातून मला असे वाटते की सृजनशीलता म्हणजे पूर्णत: नवा विचार किंवा नवी कल्पना सुचणे असे नाही. एखादवेळी पूर्णत: नवी कल्पना अचानक चमकतेही. तो सृजनशीलतेचा एक प्रकार आहे. सृजनशीलता म्हणजे दरवेळी नवेच सुचणे नसून एखादी समस्या सोडवताना जुने अनुभव जागृत करून त्या अनुभवांचे तुकडे, कल्पना इ. एकत्र करून नव्या प्रश्नाचे उत्तर शोधणे–सापडवणे ही अंतर्दृष्टी म्हणजे सृजनशीलता यातून असे लक्षात येईल की, सृजनासाठी अस्वस्थता हवी, प्रश्नाने भेडसावणे असावे आणि पूर्वानुभव भरपूर असावेत. शिक्षणात अनुभवाचे महत्त्व निर्विवाद आहे. या अनुभवांकडे नीट पाहण्याचे शिक्षण देणे हेही शिक्षकाचे काम आहे.

**सृजनशीलतेबाबतची गृहीतके :**

नव्या संदर्भात पूर्वज्ञानाची पुनर्मांडणी करून माहीत नसलेले शोधून काढणे यासाठी –

१) नवे करून पाहण्याची गरज व शक्ती असावी लागते.

२) एका प्रश्नाला एकच उत्तर असेल असे नाही. त्याला अनेक उत्तरे असू शकतात, याचा शोध घेण्याची वृत्ती असावी.

३) प्रत्येक माणूस सृजनशील असतो. ही जन्मजात गुणवत्ता प्रगट करता येते. शिक्षणाने सृजनशीलता वाढवता येते.

४) सृजनशीलता वाढवण्याची एकच एक पद्धत नाही. त्या-त्या समाजाच्या संस्कृतीतून-परिस्थितीतून त्या पद्धती शोधता येतात.

वरील चार गृहीतके घेऊन शिक्षकाची सृजनशीलता या विषयाकडे वळते.

शिक्षक सृजनशील असतील तर त्याचे विद्यार्थी सृजनशील होतील असे मानून शिक्षकाच्या सृजनशीलतेचे दोन भाग मी पाडले आहेत.

(अ) आपल्या पेशासाठी (समस्या सोडवण्यासाठी) स्वत:तली सृजनशीलता वापरायला हवी. यासाठी पुढील बाबींचा विचार होऊ शकेल.

१. साहित्य निर्मिती, २. अध्यापन कौशल्य, ३. वर्गरचनेत बदल, ४. मुलांशी संवाद, ५. विविध विषयांतील खेळ शोधणे, ६. बालसाहित्य निर्मिती (गाणी, गोष्टी, नाटुकली इ.), ७. मूल्यमापन पद्धती शोधणे, ८. पालक व समाजाचा सहभाग घेणे.

(ब) आपल्या समोरच्या मुलांची सृजनशीलता जागवणे.

१. यासाठी त्यांच्यात सृजनशीलता आहे यावर विश्वास हवा.

२. सृजनात्मक कार्यक्रम आवश्यक वातावरणासह देता यावेत.

बालशिक्षणाचा विचार करताना तीन ते सहा आणि सात ते दहा अशा दोन वयोगटांचा स्वतंत्रपणे विचार करावयला हवा. याचे कारण असे की, शिकण्याची प्रक्रिया मूर्ताकडून अमूर्ताकडे होत असते. यात चार पायऱ्या येतात.

१) मूर्त - प्रत्यक्ष अनुभव

२) अर्धमूर्त - अनुभवांसाठी चित्र, वस्तू यांचा वापर

३) अर्धअमूर्त - प्रतीकांचा वापर

४) अमूर्त - चिन्ह, खुणा, सांकेतिक भाषा, लिपी यांचा वापर.

बालशाळेतील मुले यांतील पहिल्या दोन पायऱ्यांवर असतात तर प्राथमिक शाळेतील मुले पहिल्या दोन पायऱ्यांबरोबर पुढील दोन पायऱ्या चढत असतात. त्यामुळे दोन्ही गटांना देण्याच्या अनुभवांचा, त्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनाचा स्वतंत्र विचार करायला हवे. येथे आपण फक्त बालशाळेतील मुलांच्या सृजनशीलतेचा विचार करू. सर्व बालशाळांमध्ये सृजनशील शिक्षणाचे उपक्रम म्हणून हस्तकला, चित्रकला, अभिनय गीते यांचा समावेश केला जातो. परंतु बालशाळेतील वरील उपक्रम बहुतेक वेळा अनुकरण पातळीवरच थांबतात. माझ्या विधानाचे स्पष्टीकरण देण्यासाठी बालशाळेतील हस्तकलेच्या हेतूंकडे व उपक्रमांकडे नजर टाकू.

१) अनुकरण-घडीकाम, मातीकाम, चित्रकला इ.

२) नीटनेटक्या कामांची सवय, सौंदर्यदृष्टीचा विकास - ठसेकाम, दोरा काम इ.

३) स्थिरता व एकाग्रता, ओवणे, आकारावर मणी ठेवणे इ.

यात सृजनशीलतेचा विचार दिसत नाही. शिक्षकाने म्हटलेली गाणी मुलांनी तशीच कृती करून म्हणणे यातही अनुकरण अपेक्षित असते. तशाच्या तशा गोष्टी सांगणे, भाषणे पाठ करणे, नाटकातले संवाद अचूक म्हणणे यांतून सृजनशीलता वाढीस कशी लागेल?

आपण करतो त्याच उपक्रमांत थोडे पुढे जाऊ या आणि ते सृजनशीलतेच्या पातळीवर नेता येतात असे पाहू या. येथे दिलेले उपक्रम आम्ही 'फुलोरा' या बालशाळेत केलेले आहेत. येथे नमुन्यादाखल काही नोंदवत आहे.

१) दोराकाम कसे घ्यायचे हे सर्व शिक्षकांना माहीत आहे. दोराकामात कागदाच्या घडीमुळे दोन बाजूला

तंतोतंत सारख्या आकृत्या तयार होतात. अशी आठ-दहा कामे करून घ्या. आता घडीवर कागद कापून त्या जोड्या सुट्या करा म्हणजे दहा जोड्यांचे वीस कागद झाले. हे सुटे कागद मुलांसमोर विखरा. मुलांना सारख्या आकाराच्या जोड्या शोधायला सांगा. यात मुले आकारांतील, रंगांतील साम्यभेद बारकाईने निरखतील, त्यांनी केलेले चित्र ते शोधण्याचा प्रयत्न करतील. खेळून तर पहा. मुलांनी स्वत:चे खेळणे स्वत: बनवले की त्यांना होणारा आनंद पाहण्यासारख्या असतो. खेळणे कसे बनवता येईल याचा विचार करणे ही शिक्षकाची सृजनशीलता, ते बनवणे, शोधणे, खेळणे ही मुलाची सृजनशीलता. समस्येसाठी शोध घ्यायला भाग पाडते ती सृजनशीलता. नवे करून पाहण्याची इच्छा आणि शक्ती म्हणजे सृजनशीलता.

सृजनशील महाकवी रवींद्रनाथ टागोर यांनी आपल्या लहानपणी आपण साध्यासाध्या गोष्टींतून खेळणी तयार करायचो, स्वत:च्या कल्पनेप्रमाणे खेळ तयार करायचे आणि खेळगड्यांचा संपूर्ण सहभाग यात असायचा यातून सर्जकवृत्ती कशी वाढली हे (संस्कृती आणि प्रगती) यात लिहिले आहे. आपणही हे लक्षात घेऊ या. मुलांची खेळणी मुलांना बनवू द्या. मुलांचे खेळ त्यांना शोधू द्या. त्यातून त्यांना सर्जनशक्ती आणि आनंद दोन्ही मिळते.

२) कोणतीही संकल्पना शिकवायची असली तरी आपण बालशाळेतील शिक्षक साधनांचा विचार निश्चितच करतो. परंतु त्याच साधनांमध्ये अडकून पडणे आवश्यक आहे का? उदा. लांबीची संकल्पना देण्यासाठी माँटेसोरी मेथडप्रमाणे लांब जीना हे साधन वापरले जाते. साधनाची अचूकता कौसुकास्पद असली, तरी मूल साधन शिकल्यावर त्याची संकल्पना स्पष्ट झाली की ते साधन खेळू लागले हे पहाणे शिक्षकाचे काम आहे. मूल्यमापनासाठी नवे साधन बनवणे गरजेचे आहे. जर एखाद्या शिक्षकाने सुपारीच्या चमच्यापासून पळीपर्यंत ८-१० चमचे मुलांसमोर टाकले आणि उंचीप्रमाणे क्रम लावायला सांगितले तर लांबीची संकल्पना तपासता येईल ना? छोट्याशा पुस्तकापासून डिक्शनरीपर्यंत पुस्तके आकारमानासाठी वापरता येतील ना? असा विचार केला की रोज नवे साधन आपण बनवू शकतो. परिचयाच्या वस्तू, घरगुती वस्तू वापरून शिकायला मुलांना जास्त आवडते असा माझा अनुभव आहे. एका प्रश्नाला एकच उत्तर असते असे नाही तर अनेक उत्तरे असू शकतात. आपली साधननिर्मिती आपण करू शकतो. या साऱ्या विश्वासातूनच शिक्षकाची सृजनशीलता प्रगट होत असते.

३) एकदा किशोरीताईंनी प्रत्येक कागदावर घोसाळ्याच्या ५-६ पांढऱ्या बिया चिकटवल्या. प्रत्येक कागदावर त्या वेगवेगळ्या पद्धतीने चिकटवल्या होत्या. त्या मुलांना म्हणाल्या, 'या बियांचा उपयोग करून तुम्ही चित्र तयार करायचे आहे.' अशा कामांचा मुलांना सराव असला की त्यात त्यांना अवघड काहीच वाटत नाही. ती लेगच सरसावतात. मग कोणी प्रत्येक बी भोवती फूल काढून बाग फुलवली कोणी फुलपाखरे उडवली. कोणाला त्या बिया म्हणजे शर्टची बटने वाटली त्याने त्याभोवती प्रमाणात शर्ट काढला, तर कोणाला तीच सापावरची नक्षी दिसली त्याने त्याचा साप केला. प्रत्येक मुलाचे नवे चित्र तयार झाले. बिया त्याच, निर्मिती अनेक असा हा अनुभव होता. मुले सहसा एकमेकांचे बघून काम करीत नाहीत. त्यांना जे दिसते-जे भावते तेच ती मांडतात. आपण मात्र त्यांना 'माझ्यासारखे कर' असे सांगून पंगू बनवतो. त्यांच्या सृजनशीलतेचा अंकुर खुडतो.

४) मागच्या वर्षी फुलोरात मूल्यमापनानिमित्त प्रश्नमंजुषा रंगली होती. त्यातील एक कृती होती की दाखवलेल्या वस्तूचे नाव सांगायचे आणि त्याबद्दल एक वाक्यही सांगायचे. यात थर्मामीटर, भोवरा, नेलकटर, मधमाशीचे पोळे, शंख, बाटली धुण्याचा ब्रश, गांधीजींचा फोटो, रवी, माऊस अशा बऱ्याच वस्तू होत्या. मुले वस्तू ओळखत

होती त्याबद्दल बोलत होती. धैर्यशील शंखाबद्दल बोलताना म्हणाला, 'आपल्याला पाण्याची धार पुढे पाडायची असेल तर हा तिथे लावायचा.'

सृजनशीलता वाढवण्याची एकमेव पद्धत नसते. त्या त्या समाजाच्या संस्कृतीतून त्या पद्धती शोधता येतात. आपल्याला जे माहीत आहे, तेच नव्या संदर्भात उपयोग करण्याची शक्ती मुलांमध्ये असतेच; ती प्रगट करण्याची संधी आपण द्यायला हवी.

५) अनुभवांकडे पाहण्याची सवय लावण्यातून सृजनशीलता वाढते असे मी सुरुवातीला म्हटले आहे. फुलोरात एखादा उपक्रम झाला (शेकोटी, क्रीडामहोत्सव, रात्रनिवास, बी तून झाड डोकावणे इ. काहीही) की त्या अनुभवाबद्दल मुले चित्र काढतात. ही त्यांची चित्रलिपी असते. अभिव्यक्तीची भाषा. त्यांना दिसलेले, आवडलेले सांगावेसे वाटलेले ते या चित्रातून, रंगातून वापरलेल्या जागेतून, प्रमाणातून मांडत असतात. त्यात अमुकच का? तमुक कसे नाही ही चर्चा आपण करायची नसते. त्याचा विकासाच्या पायऱ्या तो चढत असतो. सृजनशीलता म्हणजे स्वत:तील विकासाच्या बदलाची मालिका आहे. प्रयत्न करून त्याची तोच ती विकसित करीत असतो. अनुभवाचे दृष्यरूप आणि कल्पना यातून मुलाचे शिक्षण होत असते. यासाठी त्याला मोकळीक, मोकळा वेळ आणि मोकळे वातावरण हवे.

येथे मी नमुन्यादाखल काही उदाहरणे दिली आहेत अशी अनेक उदाहरणे भाषा शिक्षणासाठी सांगता येतील.

मुले बोलण्यात टोकेरी दगड, कापूस ससा, दगडू कासव, घड्याळातील मोठा काटा म्हणजे बाबा काटा आणि लहान काटा म्हणजे आई काटा अशी जी सूचक नावे देतात, तीही सृजनशीलताच आहे. सुरांवर तालबद्ध नाचणे, वाळूत कधी किल्ले बांधणे कधी विहिरी खणणे, रचना पेटयातून बंगले बांधणे, गोष्टी रचणे ही सारी सृजनशीलतेचीच रूपे असतात. मुलांमध्ये सृजनशीलता असते यावर शिक्षकाचा विश्वास असायला हवा. आमचा हा विश्वास मुलांनीच दृढ केला आहे. त्याचे असे झाले की, दिवाळी पुढ्यात आली होती. फुलोरात मातीच्या पणत्या करण्याच्या खटपटीत सारे छोटे छोटे हात होते. प्रत्येकाच्या एक-दोन पणत्या होईपर्यंत मनोजने ७-८ पणत्यांची ओळच लावली. सगळ्या पणत्या एकसारख्या अगदी नेटक्या. हे त्याला इतक्या झटपट कसे साधले? पहातो तो काय? मनोज मातीच्या गोळा करीत होता आणि डावा हात कोपरापाशी दुमडून बाहेर येणाऱ्या हाडावर तो गोळा दाबून एकसारख्या पणत्या घडवीत होता.

बालशाळांमध्ये अनुभवांची रेलचेल असली पाहिजे. प्रदर्शन भरवणे, संग्रह करणे, भाषिक खेळ खेळणे, छोटी छोटी कोडी रचणे आणि सोडवणे, प्राणी पक्षी निरखणे, खाऊ बनवणे अशा साऱ्यांची लयलूट हवी. शाळांमध्ये मुलांसाठी मजा हवी, कृती हवी, दोस्ती हवी अशा शाळा म्हणजे सृजनशील बालशाळा म्हणता येतील.

येथे एक बाब लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे आपण अपेक्षिलेले बालशिक्षण पालकांपर्यंत पोचवण्याची जबाबदारी आपलीच आहे. घर आणि शाळा एकमेकांना पूरक असायला हव्यात. शाळेमध्ये मिळणारे अनुभव, वातावरण, शाळेने जपलेली मूल्ये याबद्दल पालकांना कल्पना द्यायला हवी. तसा प्रयत्न घराघरातून झाला तरच मुलाचा विकास सुखरूप होणार आहे. आपल्या उपक्रमांसाठी पालकांची मदत घेणे, त्यांची सृजनशीलता वापरणे किंवा जागवणे हे ही बालशाळेसाठी आवश्यक काम आहे. आपल्या समाजातही अशी अनेक माणसे असतात की जी मुलांवर, उमलत्या पिढीवर प्रेम करतात. त्यांचे कौशल्य त्यांची दृष्टी आपण आपल्या मुलांसाठी उपयोगात आणली पाहिजे.

---

अभिलाषा सोडलेला माणूस श्रीमंत, तर लोभ सोडलेला माणूस सुखी होतो.

मुले सृजनशील व्हावीत अशी इच्छा असेल तर प्रथम आपण शिक्षकांनी आपली सृजनशीलता प्रगट करायला हवी. ती आपल्याजवळ आहे हे निर्विवाद आहे. अर्थात ती प्रगट होण्यासाठी शिक्षकांचे मुलांवर प्रेम हवे. आपल्या कामासाठी वेळ देण्याची, कष्ट घेण्याची तयारी हवी. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शाळांमध्ये शिक्षकांना विचार स्वातंत्र्य हवे.


**सुचिता पडळकर**
५९, प्रतिभानगर,
कोल्हापूर.

लेखिका फुलोरा बालशाळेत शिक्षिका म्हणून कार्यरत आहे. सृजन-आनंद विद्यालय, कोल्हापूर या प्रायोगिक प्राथमिक शाळेत गेली १८ वर्षे मानद शिक्षिका म्हणून काम करीत आहे.

(महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेच्या सौजन्याने)

●●●

## सहवेदना



**समर्थ सेवक मंडळ, प्राच्यविद्या अभ्यास संस्था, ठाणे, बास्केटबॉल संघटना अशा अनेक संस्थांमधून आपल्या कार्याचे योगदान देणारे श्री. विश्वनाथ शेंड्ये (७२) यांचे २४ जानेवारी रोजी निधन झाले. हसतमुख व्यक्तिमत्त्व, अभ्यासूवृत्ती, कार्यकर्त्याची समर्पित भावना हे त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे खास विशेष होते.**

**त्यांच्या जाण्याने वरील संस्थांची अपरिमित हानी झाली आहे. त्यांच्या आत्म्यास शांती मिळावी हीच ईश्वरचरणी प्रार्थना.**

**संपादक, दिशा**

घोड्यांना माणसाळवण्याचा इतिहास मानवी समाजाइतकाच जुना आहे. या घोड्यांच्या गुणसूत्रांसंबंधातील अभ्यासाचा अहवाल 'सायन्स'च्या ६ नोव्हेंबर २००९ च्या अंकात (पृ. ८६५-८६७) देण्यात आला आहे.

नॉर्वे, स्वीडन व अमेरिकेतील तलावांच्या तुलनात्मक विश्लेषणावरून असे दिसून आले आहे की पृथ्वीच्या पर्यावरणातील आवश्यक पोषण द्रव्यांवर मानवी घडामोडींचा प्रभाव पडत आहे. या संदर्भातील एक अभ्यास (Shifts in Lake N:P stoichiometry and Nutrient Limitation by Atmospheric Nitrogen Deposition) सायन्सच्या ६ नोव्हेंबर २००९ च्या अंकात (पृ. ८३५ ते ८३७) देण्यात आला आहे. नायट्रोजन चक्रमुळे जागतिक पर्यावरण प्रक्रियांवर पडणारा हा परिणाम मानवी वसाहतीतील तलावांबरोबरच दूरवरच्या तलावांवरही होत आहे.

**काही संकेत स्थळे :**

१) www.sciencenow.org (दैनंदिन विज्ञानवार्ता)

२) www.sciencecareers.org/carrer_mgazine
(वैज्ञानिकांच्या व्यवसायांसाठी)

३) www.sciencetranslational.medicine.org
(वैद्यक शास्त्र व विज्ञान यांच्या संबंधात)

४) www.sciecesignating.org
(Signal Transduction Knowledge environment)

५) www.sciencemag.org
('सायन्स' नियतकालिकाचे संकेत स्थळ)

# बालशिक्षणातील संगीत व नाट्याचा वापर

*बालशिक्षण हा चिंतनाविषय या लेखमालेतून मांडला आहे. या लेखात बालशिक्षणातील संगीत व नाट्य यांचे महत्त्व अधोरेखित केले आहे – संपादक*

आजवर आपण बालशिक्षणासंबंधी अध्ययना–बाबतच्या अनेक गोष्टींची चर्चा केली. भाषा आणि गणिती विकासाची तंत्रे, परिसर जाणीवेचे महत्त्व, मेंदू संशोधन, भौतिक सुविधा, साधनांचे महत्त्व अशा अनेक कंगोऱ्यांबद्दलची माहिती जाणून घेतली. या सर्वांबरोबरच सर्वार्थाने महत्त्वाचा कंगोरा म्हणजे प्रभावी बालशिक्षणासाठी आवश्यक असलेल्या संगीत आणि नाट्याचे महत्त्व. अमेरिकेतील एक नामांकित मज्जाशास्त्रीय प्राध्यापक डॉ. डी. जॉय. कोल्टर यांनी म्हटलंय की बालपणीची गाणी, सांगितिक हालचाली आणि सांगितिक खेळ हे त्या वयातले ‘उत्तम मज्जाशास्त्रीय व्यायाम’ असतात, ज्यामध्ये भाषा विकास, ज्ञानेंद्रिय विकास, स्नायू कौशल्ये यांचा समावेश असतो. गाणी आणि संवाद याबरोबर मेळ असलेल्या लयबद्ध, तालबद्ध हालचालींचे खेळ हे मुलांच्या मानसिक विकासास कारणीभूत ठरतात. मज्जामानसशास्त्र असं सांगत की मुलाला जन्मत:च अत्युच्च अशी सांगितिक योग्यता प्राप्त झालेली असते. ह्या चेतापेशींच्या जुळणीचा योग्य वापर न केल्यास त्या झडून जातात. तेव्हा त्या दृष्टीने विचार करताना चार प्रमुख घटक विचारात घेऊन बालशिक्षणातील संगीत कार्यक्रम आखावा. हे चार घटक म्हणजे १. श्रवण, २. गायन, ३. नृत्य (सृजनशील हालचाली), ४. वाद्य वादन. यांतूनच कृतिशील संगीत निर्मिती घडू शकते.

मुलांना संगीत किंवा गाणी ऐकवणं हे खूप महत्त्वाचं असतं. मधुर आवाजाची देण सर्वांनाच नसली तरी संगीत ऐकण्याच्या अनेक संधी प्राप्त झाल्यास मुलांचा कान तयार होत असतो. अगदी बालवाडीपासून मुलांना गाणी म्हणायला प्रोत्साहन दिले पाहिजे. त्यांच्याबरोबर गाणी म्हटली पाहिजेत. ही गाणी सुद्धा दैनंदिन जीवनाशी निगडित आणि मुलांना समजतील अशा आणि आपल्या वाटतील अशा शब्दांची गाणी असावीत. उगीच अलंकारिक शब्द आणि कठीण चाल असलेली गाणी मुलांच्या तोंडी शोभत पण नाहीत आणि त्यातील आनंद त्यांना लुटता येत नाही. ‘लहान माझी बाहुली’ किंवा ‘येरे येरे पावसा’ सारखी गाणी कितीही जुनी झाली, तरी मुलांना ती आवडतात. ती गाताना मुलं भरभरून आनंद लुटतात.

नृत्याच्या बाबतीत, अगदी पद्धतशीर पदन्यास करून, तालबद्ध आणि लयबद्ध पावलं टाकून नाचणे हे तीन नी चार वर्षांच्या मुलांना शक्यच नसतं. परंतु संगीत ऐकता ऐकता डोलणे, टाळ्या वाजवणे, थाप देणे किंवा पायांनी ताल धरणे किंवा तालावर उड्या मारणे या गोष्टी ती करू शकतात. यातूनच पुढे त्यांना स्वतंत्रपणे ताल आणि ठेक्यावर नृत्य करण्याची जाण येते.

मुलांना स्वतंत्रपणे प्रयोग करण्याची उर्मी असते. तेव्हा त्यांना त्यांच्या कलेने प्रयोग करत करत संगीतनिर्मिती करण्याची संधी द्यावी. त्या साठी खोका, डबा, वाटी–चमचा, काचेचा बाऊल, काडी, घंटा इत्यादी गोष्टी वापरू द्याव्यात. निसर्गातूनही अनेक वाद्ये तयार होतात उदा. गुलमोहराची शेंग, दगड, नारळाची करवंटी, गुंजा, बिया, वाळलेलं कवीट, गवताची पात यांसारख्या वस्तू हाताळून, पडताळून बघू देत. अनेक प्रयोगांतून झालेल्या

निर्मितीच्या आनंदामुळे त्यांचा आत्मविश्वास दुणावत असतो.

जितकं महत्त्वाचं संगीत तितकचं महत्त्वाचं नाटक. आजच्या आधुनिक शिक्षण पद्धतीमधे सर्वच शैक्षणिक संस्थांनी नाट्याद्वारे शिक्षण प्रसाराचे तंत्र अवलंबिले पाहिजे.

❇ नाट्य हे दळणवळणाचे एक प्रभावी साधन आहे. भाषा येत नसली तरी एखादी माहिती सांगण्यासाठी किंवा एखादी गोष्ट व्यक्त करण्यासाठी चेहऱ्यावरील हावभाव किंवा कायिक अभिनयाचा वापर करू शकतो.

❇ एखादी गोष्ट नुसतीच ऐकण्यापेक्षा ती दृश्य स्वरूपात बघितल्यास मुलांच्या मनात कायमची ठसते.

❇ धडे किंवा गोष्टी नुसत्या तोंडी समजावून सांगण्यापेक्षा त्यांचे नाट्यीकरण करून सांगितल्यास मुलांना ते मनोरंजक वाटतं.

❇ Role-play किंवा व्यक्ति चित्रण केल्यास गटातील जास्तीत जास्त मुलांना या प्रकल्पामधे समावून घेता येतं; शिवाय सामायिकपणाची भावना ही वेगळाच आनंद त्यांना देऊन जाते.

❇ नाट्यामधून मुलांची संकुचित वृत्ती कमी होऊन सभाधीटपणा आणि चुणचुणीतपणा येतो. मुलं अधिक धीट आणि आत्मविश्वासू बनतात.

❇ वर्गामधे शिक्षिकांनी एखादा धडा शिकवण्यासाठी एक व्यक्ती तंत्र म्हणून स्वत: करून किंवा मुलांच्या सहभागाने गट प्रकल्प म्हणून सुद्धा नाट्याचा वापर करता येतो.

❇ नाट्यतंत्रामधे ध्वनी आणि संगीताचा समावेश केला, तर संकल्पनेचा गाभा किंवा मांडायचा विचार हा प्रभावीपणे व्यक्त होऊ शकतो. संगीतामुळे वातावरण निर्मिती होते आणि विशिष्ट वेळ किंवा काळ प्रतीत करता येतो.

❇ वारा, नदी, समुद्र यासारख्या अमूर्त गोष्टी नाट्य आणि संगीतामुळे दाखवणं शक्य होतं. परी, राक्षस, राजा यांसारख्या काल्पनिक व्यक्तिरेखा वेशभूषा आणि रंगभूषेमुळे दाखवणे शक्य होतात.

❇ वेशभूषा आणि हलकी रंगभूषा यामुळे नाट्य प्रभावी होऊ शकतं.

❇ वर्गामधे उपलब्ध असलेल्या गोष्टी, वस्तू किंवा शाळेच्या बागेमधील, पटांगणातील एखादा कोपरा यांच्या आजूबाजूस उपलब्ध असलेल्या गोष्टी तुम्ही नेपथ्य म्हणून वापरू शकता. एखाद्या धड्याचे नाट्यीकरण करण्यासाठी काय कराल? –

☺ प्रथम धडा गोष्टी रूपात रूपांतर करून घ्या. हे करत असताना तुमच्या मुलांचा वयोगट लक्षात घ्या.

☺ मग गोष्टीला संवाद रूप द्या. जास्तीत जास्त मुलांना सामावून घेण्याचा प्रयत्न करा. या ठिकाणी गोष्टीचे विषयांतर होणार नाही, याची काळजी द्या.

☺ सादरीकरण कुठे करणार आहात ते स्थळ नक्की करा.

☺ ज्या वस्तू नेपथ्य म्हणून वापरणार त्या आधीच एकत्र करून ठेवा.

☺ मुलांच्या भूमिका ठरवून देऊन त्यांना सोपे सरळ संवाद ठरवून द्या.

☺ सादरीकरण सुरू करा. ते सुरू असताना भूमिका न मिळालेल्या मुलांना प्रेक्षक करा आणि नंतर त्यांना घेऊन याच नाटकाचे पुन्हा दृढीकरणासाठी सादरीकरण करा. निर्जीव गोष्टींसाठीही मुलांना भूमिका द्या. उदा. झाड, दगड, कपाट.

(पान क्र. १८ वर)

# 'भावसाधना' - संस्कारक्षम निर्मिती

*श्री समर्थ सेवक मंडळाच्या भावसाधना या पुस्तिकेची ही माहिती आहे. संस्थेचे उपशास्ते श्री. लागू यांनी या पुस्तिकेचे महत्त्व येथे सांगितले आहे - संपादक*

पुस्तक परिचय, पुस्तक परीक्षण, पुस्तक समीक्षण अशा विविध शीर्षकांतर्गत लेखकांची निरनिराळ्या वाङमयीन प्रकारांतील विविध विषयांवरील अनेक नव-नवीन पुस्तके प्रकाशित झाल्याचं आपण वाचत असतो. त्यांच्या प्रकाशनाने मराठी साहित्यात मोलाची भर पडत असते. त्यांपैकी काही केवळ अनुवादित असतात तर काही अन्य भाषेतील प्रकाशित झालेल्या उत्तम आणि दर्जेदार पुस्तकांचा संदर्भ आणि त्यांचा मूळ आशय आणि विषय लक्षात घेऊन, आपल्या सृजनशीलतेने जणू काही ती त्या लेखकाची स्वत:चीच निर्मिती आहे अशा पद्धतीने लिहिलेली असतात. काही संग्रहीत केलेली असतात. तर काहींचा उपयोग आपणाला संदर्भ ग्रंथ म्हणून होत असतो. परंतु सर्वच पुस्तकांचा परिचय वृत्तपत्रातून अथवा मासिकातून, साप्ताहिकातून येत असेलच असे नाही. परंतु अशी पुस्तकेदेखील मराठी भाषेत महत्त्वाची आणि मोलाची भूमिका बजावीत असतात; मराठी भाषा समृद्ध करीत असतात. जसं समाजाच्या निरनिराळ्या क्षेत्रात विविध संस्थाच्या माध्यमातून अनेक सामाजिक कार्यकर्ते सामाजिक कार्य आणि समाज सेवा करीत असतात परंतु सगळ्यांनाच प्रसिद्धी, पुरस्कार आणि मानसन्मान प्राप्त होतात असं नाही. किंबहुना काही कार्यकर्ते प्रसिद्धी वलयापासून चार हात दूर राहणंच अधिक पसंत करतात.

वरील प्रस्तावना देण्यामागे प्रयोजन म्हणजे काही महिन्यांपूर्वी श्री समर्थ सेवक मंडळ, ठाणे या संस्थेने 'भावसाधना' पुस्तिकेची सातवी आवृत्ती प्रकाशित केली. अर्थात ती केवळ खाजगी वितरणासाठी असल्यामुळे याचीही कुठेतरी नोंद असणं आवश्यक वाटल्याने, केवळ माहिती या दृष्टीने हा परिचयात्मक लेख लिहिला आहे.

श्री समर्थ सेवक मंडळाची ओळख ठाणेकरांना करून देण्याची खरंतर गरज आहे असं वाटत नाही. परंतु लेखाचा भाग या दृष्टीने ती देणं जरूरीचं वाटतं. ''मुख्य ते हरिकथा निरूपण'' हे संस्थेचे ब्रीद आहे. ठाणे शहराच्या सामाजिक जीवनातील सांस्कृतिक, शारीरिक, शैक्षणिक आणि आध्यात्मिक क्षेत्रात मंडळाने आपला नावलौकिक, स्वत:च स्थान निर्माण केलं असून आपलं वेगळेपण सिद्ध केले आहे. संस्था विविध उपक्रमांद्वारे सातत्याने गेली ९३ वर्षे समाजसेवेचे, समाज प्रबोधनाचे आणि विद्यार्थी घडविण्याचे कार्य करीत आहे. श्री समर्थ रामदासांसारख्या अलौकिक संत श्रेष्ठांच्या अधिष्ठानावर आणि आध्यात्मिक बैठकीवर संस्था उभी आहे.

मंडळाच्या विविध उपक्रमांपैकी एक प्रमुख आणि उल्लेखनीय उपक्रम म्हणजे शिवसमर्थ विद्यालय प्राथमिक व माध्यमिक विभाग. संस्थेच्या विविध उपक्रमांत काही गौरव स्थाने, श्रद्धास्थाने आहेत. ज्यांचा मंडळाला सार्थ अभिमान आहे. यातील एक प्रमुख म्हणजे <u>शालेय परिपाठ!</u> मूल्य शिक्षण हा शब्दसुद्धा आधुनिक भारतीय शिक्षण पद्धतीत रुढार्थाने माहीत नव्हता, त्यावेळी म्हणजे गेली चार दशके विद्यालयाचा शालेय परिपाठ अविभाज्य घटक बनला आहे. किंबहुना विद्यालयाची ती एक प्रमुख ओळख असल्याचे नमूद करावेसे वाटते. आणि अशा ह्या परिपाठाचा मूलस्रोत आहे. 'भावसाधना' पुस्तिका!

माध्यमिक शालेय समूहात शिवसमर्थ विद्यालयाने स्वत:चे आगळे-वेगळे स्थान, दर्जा आणि नावलौकिक निर्माण केला आहे. विद्यार्थी केंद्र स्थानी मानून त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा, ते संस्कारक्षम व्हावेत, त्यांनी मने सुसंस्कारित व्हावीत, त्यांचे भावजीवन संपन्न व्हावे, ती शिस्तप्रिय व्हावीत, भावी आयुष्यात आदर्श नागरिक बनवीत, त्यांच्यात राष्ट्रभक्ती, वीरवृत्ती निर्माण व्हावी या विविध भावनांतून शाळा नेहमीच प्रयत्नशील आहे. हे नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

सांगावयास मनस्वी आनंद आणि समाधान वाटते की भावसाधना पुस्तिकेची सातवी सुधारित आवृत्ती मंडळाने यावर्षी प्रकाशित केली. पुस्तिकेच्या सात आवृत्या निघल्या ही निश्चितच अभिनंदनीय आणि कौतुकाची घटना आहे. यावरून या पुस्तिकेची उपयुक्तता आणि विद्यार्थीप्रियता दिसून येते. या पुस्तिकेतील विचारधन विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याचे पवित्र व महत्त्वाचे कार्य जवळ जवळ चार दशके केले जात आहे. कालानुरूप आवश्यक ते बदल नवीन आवृत्तीमध्ये केले असून विद्यार्थ्यांना त्याचा निश्चितच फायदा होईल असा विश्वास आहे.

या पुस्तिकेची विशेष उल्लेखनीय, अभिनंदनीय आणि गौरव वाटावा अशी गोष्ट म्हणजे विद्यालयाचा कोणताही माजी विद्यार्थी भेटला तर ''माझ्या यशस्वी जीवनाच्या वाटचालीत आणि माझ्यावर झालेल्या सुसंस्कारात जसा गुरुजनांचा, विद्यालयाचा वाटा आहे तसाच तो शालेय परिपाठाचा म्हणजेच पर्यायाने भावसाधना पुस्तिकेचाही आहे'' ही भावना तो आवर्जून व्यक्त करतो. मुद्दाम उल्लेख करावयाची गोष्ट म्हणजे इंग्लड, अमेरिका, ऑस्ट्रेलिया या आणि अशासारख्या प्रगत देशांत गेलेल्या माजी विद्यार्थ्यांमार्फत भावसाधना ही पुस्तिका साता समुद्रापलीकडे पोहोचली आहे. विशेष म्हणजे हे माजी विद्यार्थी आपल्या पाल्यांना पुस्तिकेची महती, उपयुक्तता आणि संस्कारक्षमता कशी व किती आहे हे आवर्जून सांगतात, हे स्वातुभवावरून सांगू इच्छितो.

**आता या पुस्तिकेच्या अंतरंगासंबधी :**

पुस्तिकेला अनुक्रमणिका आहे. यावरून नजर टाकल्यास आपल्या लक्षात येईल की जे संस्कारधन विद्यार्थ्यांपर्यंत जाणे आपणांस अभिप्रेत आहे आणि ज्याद्वारे मुलांवर संस्कार होतील ह्या सर्व बाबींचा अंतर्भाव पुस्तिकेत केला आहे. वानगीदाखल काहीचा उल्लेख करीत आहे.

वक्रतुंड महाकाय, या कुन्देन्दु तुषार हार धवला, गुर्रुब्रह्मा गुरुर्विष्णु या सारख्या सकाळी म्हणावयाच्या दैनिक प्रार्थना तर कराग्रे वसते लक्ष्मी, समुद्र वसने देवी, शुभंकरोति कल्याणम्, पूर्णमदः पूर्णमिदं, सर्ते तै सुखिनः संतु अशा सारख्या सायं प्रार्थना अर्थासहित दिल्या आहेत.

साडेतीन शक्ती पीठे, साडेतीन मुहूर्त, चार वर्ण, चार आश्रम, चार वेद, नवरस, दशावतार, दहा दिशा या आणि अशासारखी विविध माहिती ''आवश्यक माहिती'' या शीर्षकाखाली दिली आहे.

गणपती अथर्वशीर्ष, फलश्रुतीसह त्याच्या अर्थासहित दिले आहे. अथर्वशीर्षाची सुरुवात व शेवट कसा करावा याचीही माहिती दिली आहे. श्रीरामरक्षा स्त्रोत, श्री मारुतीस्त्रोत्र, पसायदान, गुर्वाष्टकम्, निवडक अभंग, भजने, गजर, विविध प्रार्थना गीते, समूहगीते, महत्त्वाच्या आरत्या, प्रार्थना मंत्रपुष्पांजली, गायत्री मंत्र, मृत्यूंजय मंत्र, गीतासार या आणि अशा सारखा विविध आध्यात्मिक खजिना विद्यार्थ्यांसाठी जाणीवपूर्वक उपलब्ध करून दिला आहे. चारही भाषांतील सुभाषिते, सुविचार यांचा अंतर्भाव केला आहे. यांचा उपयोग ''अवतरणे'' म्हणून भाषणाच्या वेळी, लिखाणाच्या वेळी आपणांला निश्चितपणे होतो हे स्वानुभवावरून सांगू इच्छितो.

श्री समर्थांचे अधिष्ठान असलेली आणि श्री समर्थांचे नाव घेऊन कार्य करणारी संस्था असल्यामुळे पृष्ठ क्रमांक चाळीस ते चौसष्ट यामध्ये करुणाष्टके, श्रीरामदास स्तुती, श्री समर्थाष्क, सवाया, चौपदी, श्रीरामनामावली, मूर्ख लक्षणं (निवक्र ओव्या) उत्तम लक्षण, श्रीमंत योगी (छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वभाव व गुणवर्णन, त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे वर्णन) आणि शिवरायाचा आठवावा प्रताप या शीर्षकाखाली संभाजी राजांना केलेला उपदेश अशा सारखे निवडक श्री समर्थ रामदास रचित साहित्य उध्दृत केले आहे. चौपदीमध्ये श्री समर्थांनी प्रभुराम चंद्राकडे कोणत्या गुणांचे मागणे केले आहे ते मननीय आणि संस्मरणीय तर आहेच परंतु त्याचे नित्य पठण करावे असे आहे. पुस्तिकेतील सर्वच लिखाण पाठ करावे असेच आहे. याच्या पठणाने मन:शांती आणि मन:शक्ती, आनंद मिळेल याची खात्री आहे.

मुख व मलपृष्ठ लॅमिनेटेड आहे. श्रीसमर्थ रामदासांचे तेजस्वी आणि ओजस्वी छायाचित्र, त्यावर 'यत्र तो देव जाणावा' हा त्यांचा मुख्य विचार तर खाली समर्थांचे श्रेष्ठत्व, अलौकिकत्व आणि वैराग्य वर्णन करणारा ''शुकासारिखे पूर्ण वैराग्य ज्याचे'' हा श्लोक मुखपृष्ठावर उध्दृत केला आहे. पुस्तिकेची सघनता वाढविण्यात त्याचा निश्चितच उपयोग झाला आहे. मुखपृष्ठाच्या मागील बाजूस आतील पानावर जन-गण-मन राष्ट्रगीत अर्थासह आणि केवळ विद्यार्थ्यांनीच नव्हे तर तुम्ही-आम्ही सर्वांनी घ्यावी अशी, राष्ट्र प्रतिज्ञा आहे.

मलपृष्ठाच्या आतील बाजूस 'मुख्य ते हरि कथा निरुपण। दुसरे ते राजकारण। तिसरे ते सावधपण। सर्व विषयी।। हे संस्थेचे ब्रीद, मंडळाचे मानचिन्हे, त्याखाली ''स्वयमेव मृगेन्द्रता'' आणि श्री समर्थ सेवक मंडळाची विविध कार्ये व उपक्रम दिले आहेत. बाहेरील बाजूस शिवसमर्थ विद्यालयांतील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यान्वित होणाऱ्या अभ्यासपूरक विविध उपक्रमांचा उल्लेख आहे.

ही छोटे खानी पुस्तिका असून केवळ खाजगी वितरणासाठी आणि शालेय विद्यार्थी, संस्थेत येणारे पाहुणे आणि मान्यवरांसाठीच आहे. पुस्तकाचं मूल्य 'अमूल्य' आहे. त्याची अनुभूती विद्यार्थ्यांनी घ्यावयाची आहे. ही पुस्तिका म्हणजे संस्कारांचा अति महत्त्वाचा ठेवा असून त्याची महती आणि उपयुक्ततेची मोजपट्टी नाही.

मंडळाचे शास्ता श्री प्रफुल्ल प्रधान यांची प्रस्तावना अतिशय समर्पक आणि बोलकी असून शेवटी ते म्हणतात, ''समर्थांच्या आशीर्वादाने संस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल चालू आहे. या वाटचालीत सर्वांच्या शुभेच्छा आमच्या बरोबर रहाव्यात'' अशी प्रार्थना केली आहे. विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे आषाढ शुद्ध प्रतिपदा - श्री समर्थ सेवक मंडळाच्या ९३ व्या वर्धापन दिनाच्या शुभमुहूर्तावर पुस्तिकेचं प्रकाशन झाले आहे. प्रत्येक पानावर शेवटी चौकटीत पृष्ठ प्रायोजकाचे नाव चौकोनात लिहले आहे. छपाईचे काम जय भारत प्रिंटीग प्रेसचे मालक श्री. शं. द. घाटपांडे यांनी सुबक पद्धतीने केले आहे.

विद्यमान आवृत्ती वाचनीय तर आहेच, परंतु संग्रहणीय, स्मरणीय आणि मननीय झाली असून संदर्भ पुस्तिका म्हणूनही तिची उपयुक्तता आहे.

विद्यार्थ्यांच्या भाव-भावना सुसंस्कारित करण्याच्या जाणीवेतून विद्यालय करीत असलेल्या प्रयत्नांमधील सातत्य-साधना-तपश्चर्या या साठीची संदर्भ पुस्तिका, अर्थात ''भावसाधना''. किती अर्थपूर्ण, उत्कट आहे पुस्तिकेचं नामाभिधान!

**श्री. सुरेंद्र लागू**
२ / पहिला मजला, यमुना सोसायटी,
गोविंद बच्चाजी रोड, चरई, ठाणे (प.)
दूरध्वनी - २५३४९३४१

●●●

# उपनिषदे - अर्थात् - ब्रह्मविद्या
## (लेखांक - २ रा)

*उपनिषदांवरील लेख मालिकेतील हा पुढील लेख - संपादक*

### आपले ज्ञान भांडार :

वेदाला शब्दब्रह्म म्हणतात. ईश्वरस्य निश्वसितम्। वेद हे जणू ईश्वराचे उच्छ्वास होते. (शंकराचार्य) वेद केवळ धर्म कल्पनाच अभिव्यक्त करीत नसून ते प्राचीन कालातील ज्ञानसागर आहेत. ज्ञान हे दोन प्रकारांनी अभिव्यक्त होते. एक इंद्रियजन्य दुसरे आंतरिक अगर स्फुरित स्वरूपाचे. पहिल्या प्रकारच्या ज्ञानात सारी भौतिक शास्त्रे मोडतात आणि दुसऱ्या प्रकारचे ज्ञान मानसिक व आध्यात्मिक स्वरूपाचे आहे. योग प्रक्रियेने हे ज्ञान अनुभवता येते. या दोन्ही प्रकारच्या ज्ञानांचा वेदांमधे विचार केलेला आहे. उपनिषदांतूनही याचा विचार केलेला आढळतो. द्वे विद्ये वेदितव्ये। पराच अपराच। काही वेळा यांचा विद्या आणि अविद्या असाही उल्लेख केला जातो. ईश उपनिषदात अशा प्रकारचा स्पष्ट उल्लेख आढळतो. विद्यांच अविद्यांचय: तत् वेद उभयं सह। अविद्यया मृत्युं तीर्त्वा विद्यया अमृतं अश्नुते। जो विद्या आणि अविद्या दोनही जाणतो, तो अविद्येने संसार तरून जातो व विद्येने अमरत्व प्राप्त करून घेतो. यामुळेच वेद खऱ्या अर्थाने शाश्वत ज्ञानाचे निधी म्हणून मानले गेले आहेत. हिंदूना वेद अत्यंत पवित्र वाटतात. शुद्ध अंत:करणाच्या आणि योग्य अशा व्यक्तींनाच संस्कारपूर्वक दीक्षा देऊन वेदांची शिकवण दिली जात असे. इतकेच नव्हे शिकविणारा गुरुही तितक्याच योग्यतेचा असे. वेद गुरुमुखातूनच शिकावे लागत. हे कटाक्षाने पाळले जात असे. म्हणूनच, आजतागायत एका कानामात्रेचा देखील बदल न होता तशाच प्रकारचे उच्चारण इत्यादींची जपणूक केलेली आढळते. सांप्रत वेद लिखित आहेत. सर्वांना ते उपलब्ध आहेत. परंतु मौखिक उच्चारण व पठण हे लुप्त झाले आहे. वेदांचा अभ्यास व मौखिक उच्चारण आणि पठण आदी पूर्वीसारखेच जतन करणे हे भारतीयांचे परम कर्तव्य आहे.

### उपनिषद ग्रंथाचा विस्तार :

श्रुति संमत धर्मालाच भारतात मान्यता प्राप्त होत असते. मुक्तिका उपनिषदात एकशे आठ उपनिषदांचा उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यापैकी खालील उपनिषदे प्रमुख मानली जातात. प्रत्येक वेदांची प्रमुख उपनिषदे याप्रमाणे ऐतरेय, कौषीतकी (ऋग्वेद) छांदोग्य, केत (सामवेद) तैत्तिरीय महानारायण, कठ, श्वेताश्वतर आणि मैत्रायणि (कृष्ण यजु) ईश, ब्रहत् आरण्यक अथर्व-मुंडक मांडुक्य आणि प्रश्न - अशी त्या वेदांची प्रमुख उपनिषदे होत. वेदान्त तत्त्वज्ञान विशद करणारा ग्रंथ ब्रह्मसूत्रे होय. यात वर नमूद केलेल्या उपनिषदातील वचने आहेत. शिवाय इतर उपनिषदांतीलही वचने आहेत. श्रीमत् आद्य शंकराचार्यांनी दहा उपनिषदावरच आपले भाष्य लिहिले आहे. त्यांची नावे येणे प्रमाणे - ईश, केन, कठ, प्रश्न, मुंडक, मांडुक्य, ऐतरेय, तैत्तिरीय, छांदोग्य, बहत् आरण्यक.

### प्रस्थानत्रयी :

उपनिषदे, ब्रह्मसूत्रे आणि गीता यांत सांगितले गेलेले ब्रह्मज्ञान हेच वेदान्ताचे तीन महान स्त्रोत होत. यांतूनच वेदान्त विचारांचा विस्तार झालेला पाहावयास मिळतो.

ब्रह्मज्ञान समजून घेण्यासाठी हे तीनही प्रकारचे ग्रंथ आवश्यक असल्याने त्यांना प्रस्थानत्रयी असे मानण्यात आले आहे. यातूनच द्वैत, विशिष्ठाद्वैत, अद्वैत, द्वैताद्वैत, शुद्धाद्वैत इत्यादी विचार प्रवाह निर्माण झाले. त्यांचे प्रवर्तक हे महान आचार्य होते. त्यांची नावे - शंकराचार्य, रामानुजाचार्य, मध्वाचार्य, वल्लभाचार्य, निंबार्काचार्य या सर्व आचार्यांनी आपआपल्या मतपुष्ट्यर्थ वरील ग्रंथांवर भाष्ये लिहिली आहेत. प्रस्थानत्रयींवर जो भाष्य लिहितो त्याला आचार्य पदवी प्राप्त होत असे. अशा पद्धतीने गीता ब्रह्मसूत्रे व उपनिषदे याजवर खूप उहापोह झालेला आहे. ही हिंदू लोकांनी जगाला दिलेली उत्कृष्ट ज्ञान संपदा आहे.

**इतर भाषांत या ग्रंथांचे भाषांतर :**

इ.स. १६५० साली शहाजहान याचा मुलगा दारा याने जवळ जवळ पन्नास उपनिषदांचे भाषांतर पर्शियन भाषेत करवून घेतले. त्यांची भाषांतरे लॅटिन भाषेत सुमारे १८०१-०२ साली काही पर्शियन लोकांनी केली, ही भाषांतरे वाचून शॉपेन होअर प्रभावित झाला व त्याने असे म्हटले की उपनिषदांच्या अभ्यासाइतके जगातील कोणतेही अध्ययन श्रेष्ठ असू शकत नाही. उपनिषदांचा अभ्यास माझ्या जीवनाचा आधार असून माझ्या मृत्यूलाही त्याचाच आधार राहील. (In the whole world there is no study so beneficial and so elavating as that of upnisads. It has been the solace of my life, it will be the solace of my death)

**श्रुतीतून एकात्म दर्शन :**

ऋग्वेदात काही स्थळी अनेकत्वाच्या कल्पनेहून भिन्न असे एकात्म दर्शन घडविणारी काही सूक्ते आहेत. सर्वांना परिचित असलेली अशी एक ऋचा आहे. एक सत् विप्रा बहुधा वदन्ति। सत्य एकच असून ज्ञाते लोक त्यालाच वेगवेगळ्या नावाने संबोधतात. अथवा जे वेगळे आहे असा भास होतो ते मुळात एकच आहे असे ज्ञाते म्हणतात. अग्निं यमं भातरिश्वान माहु:। त्यालाच कोणी अग्नि, कोणी नियमन करणारा यम, कोणी वायू असे म्हणतात. हीच एकत्वाची कल्पना उपनिषदात ठाशीव पद्धतीने कथेच्या स्वरूपात मांडण्यात आलेली आहे. केन उपनिषदात अशी कथा आहे, देव दानवांच्या युद्धात देवांना विजय प्राप्त झाल्याने त्यांच्या ठिकाणी एक प्रकारचा गर्व निर्माण झाला. त्यांचे गर्व हरण करण्यासाठी ब्रह्म यक्षाच्या रूपात त्यांच्या समोर प्रगट झाले. देव त्या यक्षाला ओळखू शकले नाहीत. अग्नि व वायु त्याजकडे त्याला जाणण्यासाठी गेले. ब्रह्माने त्यांच्या समोर काडी टाकली. अग्नी काडी जाळू शकला नाही अगर वायू ती जागची हालवू शकला नाही. दोघे ही हताशपणे खाली मान घालून इंद्राकडे परतले. शेवटी इंद्रच त्याच्या भेटीला गेला. तो येत आहे असे पाहताच यक्ष अदृश्य झाला. तिथे उमा प्रगट झाली. तिने यक्षाची खरी ओळख इंद्राला करून दिली. ब्रह्मच यक्ष रूपाने तुमची परीक्षा घेण्यासाठी प्रगट झाले होते. तुम्ही आपल्या गर्वाने ताठ झाल्याने त्याला ओळखू शकला नाहीत. ब्रह्म हेच एकमेव तत्त्व आहे. तुम्ही सारे त्याचीच रूपे आहात. सारे सामर्थ्य ब्रह्माचेच आहे. या कथेतून ब्रह्मच आदिबीज. त्याजपासून सर्वांची अभिव्यक्ती व त्याजपासूनच सर्वाना सामर्थ्य प्राप्त होत असते हे सोप्या पद्धतीने सांगण्यात आले आहे. तसेच छांदोग्य उपनिषदातही एक कथा आहे. इंद्र प्रजापतीकडे ज्ञान संपादन करण्यासाठी शिष्य म्हणून गेला होता. देवांना ज्ञानसुद्धा ब्रह्मापासूनच प्राप्त होत असल्याचे स्पष्ट केले आहे. सर्व व्यापक ब्रह्म अगर आत्मतत्वच सर्वांचे आदीबीज आहे. ते तत्त्वच सृष्टी निर्माण करते आणि सर्वांच्या अंतर्यामी प्रवेश करून प्रत्येक प्राणिमात्राच्या हृदयात वास करते. याच कारणाने त्याला अंतर्यामिन् असे म्हणतात. या पद्धतीने एकत्वाचा पुरस्कार उपनिषदात सर्वत्र केलेला आढळतो.

**ब्रह्म व आत्मन् एकच :**

ब्रह्म अगर आत्मन् व जीव यांच्यात समानता आहे. हा प्रमुख विचार उपनिषदांनी मांडलेला आहे. उपनिषदांनी हे अत्यंत अल्प शद्बात मांडलेले आहे. त्याला महावाक्ये असे म्हणतात. तत् त्वं असि। ते तू आहेस, अहं ब्रह्मास्मि। मी ब्रह्म आहे. ब्रह्मार्त्म ऐक्यं। ब्रह्म आणि आत्मा यांचे ऐक्य आहे. या वाक्यातील रहस्ये उलगडण्याचा प्रयत्न उपनिषदांनी केलेला आहे. महामना तत्व चिंतनशील ऋषींना यातील गूढार्थ उकलल्यामुळे त्यांच्या चिंतनाचा आवाका आणखी व्यापक झाला. ते सत्याचे दर्शन घेते झाले. हे उलगडण्याचे रहस्य बाहेर कुठे दडलेले नसून ते आतच आहे, हे गूढ त्याना उमजले. ते अंतर्मुख झाले. त्यांनी सर्वप्रथम या किल्लीचा उपयोग केला. अंतर मनातील कवाडे उघडी झाली. त्यांना आढळले की आपल्या आतच जे चैतन्य आहे तेच आत्मतत्त्व होय आणि तेच ब्रह्म होय. तेच तत्त्व सर्व चराचरात, सर्व पशु, पक्षी, प्राणी तसेच जळी, स्थळी, काष्ठी, पाषाणी व्याप्त होऊन राहिले आहे. 'विश्वं एव एकनीडं'। हे विश्वाची माझे घर। असा अनुभव घेते झाले. अवघे विश्वच आपण, असा त्यांना प्रत्यय आला.

**आजची गरज :**

या विश्वैक्याच्या कल्पनांवर फार पुरातन काळापासून आपले सारे सामाजिक, राजकीय, वैज्ञानिक आणि सांस्कृतिक जीवन उभे झाले आहे. सांप्रत द्रुत गतीने ही कल्पना लुप्त होत चालली आहे. वैश्विक विचाराऐवजी व्यष्टी विचार प्रबळ होत चालला आहे. वैश्विक विचार व त्यातून प्रवाहित होणारे जीवन याला आपण सोडचिठी देऊन टाकली आहे. मी आणि माझे व्यक्तिमत्त्व, याभोवती आपले सारे जीवन घिरट्या घालीत आहे. त्यातूनच जुने जे जे आहे ते सारे बुरसटलेले, ते फेकूनच दिले पाहिजे अशी शिकवण मिळत गेल्याने साहजिकच उद्‌गार निघतात. 'जुने जाऊ द्या मरणा लागुनि। जाळुन किंवा पुरुनी टाका। (केशवसुत) हा एक क्रांतिकारक विचार आहे, असा एक समजही करून दिला जातो आणि हीच आजची संस्कृती बनत चाललेली आहे. भविष्य अंधुक झाले आहे, आमच्या बुद्धीची झेप फार प्रचंड या कल्पनेने भारून जाऊन जबरदस्त आकांक्षेने जुना विचार टाकून देऊन नवा भौतिकवाद स्वीकारला आहे. या भौतिकवादातील तोकडेपणा आता ध्यानात येऊ लागला आहे. जीवन अथांग आहे. जीवनाच्या साऱ्या समस्यांना पुरुन उरेल इतके सामर्थ्य या भौतिकवादात नाही. आता जुने आणि नवे याची सांगड घालून समाजाची नव्याने बांधणी करावी असा विचार प्रबळ होऊ पहात आहे. हा विचार सुद्धा आपण पाश्चात्य लोकांकडून उसनवारीच्या पद्धतीनेच घेऊ पाहात आहोत. पाश्चात्य लोक योगाकडे आकृष्ट झालेले आहेत, हे पाहिल्या बरोबर आपल्या देशात गल्ली बोळातून योगासन केंद्रे स्थापित झालेली आहेत आणि होत आहेत.

पाश्चात्त्यांना उपनिषदांचा अभ्यास करावासा वाटू लागला आहे. अध्यात्म ज्ञान काय आहे याचा ते भारतात येऊन अभ्यास करू इच्छितात. कालांतराने ती त्यांची इच्छा प्रबळ होईल ती इच्छाच न राहता गरज या स्वरूपात उभी राहील. कारण पाश्चात्त्य मंडळी प्रयोगशील आहेत. केवळ वरवर विचार करून न थांबता सत्य शोधून ते तपासून पाहण्याची त्यांची आकांक्षा कृतिशील आहे. ज्या भूमीत हजारो वर्षे हा विचार रुजला गेला होता त्याचे योग्य दर्शन साऱ्या जगाला घडविण्याची क्षमता आपण घालवून बसला आहोत. या सर्वश्रेष्ठ ज्ञान भांडाराकडे आज जग आकृष्ट होऊ पहात आहे. भौतिक गोष्टीतील, फोलपणा, मर्यादितपणा, त्यातून निर्माण होणारा संघर्ष, द्वेष, मत्सर व विनाश ही सारी भयानकता निर्माण होऊ नये असे मानवाला प्रकर्षाने वाटू लागले आहे. आपण भारतीय असेच सुस्त राहणार आहोत काय? का आपल्या पूर्वजांनी ठेवलेल्या सांस्कृतिक वारशाचा उपयोग करणार आहोत?

---

संक्रमण अवस्थेचा काळ हा कसोटीचा काळ असतो.

हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित झाला आहे. भारताच्या सांस्कृतिक जीवनाच्या उत्थानासाठी प्रत्येक भारतीयाने आटोकाट प्रयत्न करणे आवश्कय आहे. आपल्या प्राचीन ज्ञान भांडाराचा अभ्यास झाला पाहिजे. संस्कृत भाषा शिकून पाश्चात्त्य माणसे उपनिषदांचा अभ्यास करू इच्छितात. आपण संस्कृत भाषा मोडीत काढलेली आहे. जगात श्रेष्ठ स्वरूपाचे जीवन निर्माण करण्यासाठी या साऱ्यांचा उपयोग करून आपण जय्यत सिद्ध झाले पाहिजे. ही आजची खरी गरज आहे '' न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते।'' ज्ञानाइतके पवित्र या जगात दुसरे काहीच असू शकत नाही.

**उपनिषदातील ब्रह्मकल्पना :**

वेद काळापासूनच ऋषींना शाश्वत एकात्म भावाचा अनुभव आलेला होता. ऋग्वेदातील काही सूक्तांवरून याचा सहज बोध होण्यासारखा आहे. जे काही सृष्ट आहे त्यामध्ये एकसूत्रता आहे, हे त्यांनी ओळखले होते. ही एकात्मताच सारे विश्व व्यापून त्याच्या पलीकडे आहे. या एकात्म भावालाच त्यानी ब्रह्म असे नाव दिले आणि हेच अविनाशी तत्त्व जीव स्वरूपात मानवात विद्यमान आहे. त्याला त्यानी आत्मा असे म्हटले आहे. अशा प्रकारे, ब्रह्म व आत्मा यांचे ऐक्यही प्रस्थापित केले. बृंह-व्यापक होणे या अर्थी ब्रह्म शब्द अस्तित्वात आलेला आहे. ब्रह्म शब्दाने व्यापकता, महानता व विस्तार असा अर्थ ध्वनित होतो आणि याला कोणी मर्यादा घालू शकत नाही. हेही व्यक्त केले जाते. आत्म शब्दाने अविकारी अंतर्यामी असलेली जाणीव अभिव्यक्त होते. ज्या जाणिवेमुळे जागृतीत स्थूल पदार्थ स्वप्नात सूक्ष्म पदार्थ व गाढ निद्रेत कारण अवस्था जाणता येते. ही न बदलणारी इंद्रियातीत जाणीव प्रत्येक मानवात त्याच्या प्रत्येक अवस्थेत विद्यमान असते. ब्रह्मज्ञानाचे मूळ वेदांतच आहे. आणि वेदान्तात याच एकात्म कल्पनेचा परिपोष करण्यात आलेला आहे. विश्व म्हणून दृश्य असणाऱ्याहून ब्रह्म भिन्न आहे. विश्व ब्रह्माची छाया वा विस्तार होय.

**सोपाधिक व निरुपाधिक ब्रह्म :**

उपाधिरहित ब्रह्म तेच निर्विशेष. दुसरे उपाधियुक्त, तेच सविशेष. एक निरपेक्ष व दुसरे सापेक्ष. निरविशेषाला परब्रह्म आणि सविशेषाला अपर ब्रह्म असे म्हणतात. परब्रह्म हे कोणत्याही संकेताने, चिन्हाने निर्देशिले जात नाही. कारण ते निर्गुण व निराकार असते. उपनिषदात परब्रह्मच वर्णिले आहे. निर्विशेष ब्रह्म प्रस्थापित करणे हेच वेदान्ताचे कार्य आहे. असे शंकराचार्य ब्रह्मसूत्र भाष्यात म्हणतात (३.२.२) तदेव शुक्रं तत् ब्रह्म तत् एव अमृतं उच्चते। तस्मिन् लोका: श्रिता: सर्वे तदु नात्येति कश्चन। उपनिषदात ब्रह्मावरच सर्व आश्रित असल्याबद्दल अनेक ठिकाणी उल्लेख आलेले आहेत. तसेच काही ठिकाणी गुण विशिष्ट ब्रह्मही वर्णिले आहे. उपनिषदात या दोनही प्रकारच्या ब्रह्माचा उल्लेख आलेला असला तरी वेदाचा हेतू निर्हेतुक निर्विशेष ब्रह्मच सांगण्याचा आहे. तेच अंतिम सत्य आहे. अंतिम सत्याचे स्पष्टीकरण करत असताना उपनिषदे निर्गुण ब्रह्माचाच प्रामुख्याने उल्लेख करतात. अशद्बं अस्पर्श, अरुपं, अव्ययं तथा अरसं नित्यं अ गन्धवत् च यत्। अनाधनन्त: महत: परंध्रुवं निचाय्य तत् मृत्यु मुखात् प्रमुच्यते (कठ १-२-१५) या बाबत रानुजाचार्य जरा वेगळा विचार मांडताना आढळतात. ते म्हणतात अंतिम सत्य सगळ्या न्यूनतेपासून मुक्त आहे. म्हणजेच ते उत्तमोत्तम आहे. ही दोन्ही मते ग्राह्य धरता येतील कारण सापेक्षतेच्या भूमिकेतून ते दोन्ही स्थूल वा सूक्ष्म संभवते पण निर्विशेषात हे संभवत नाही. एकच वस्तू दोन्ही प्रकारे कशा असू शकतील असा प्रश्न उपस्थित होतो. जिथे सर्व व्यापकत्व आहे तिथेच स्थूल वा सूक्ष्म संभवते. वास्तविक तसे ते नसते. आपल्या इंद्रियाला तसे ते भासते. परमार्थत: ते अनंतच आहे. या भासण्यालाच सोपाधिक

वा सापेक्ष भाव असे म्हणतात. मुळात ते एकरस अखंड आणि एकमेव अद्वितीयच आहे. सापेक्ष भावामुळेच ईश्वराची संकल्पना साकारलेली आहे.

**ईश्वरविषयक कल्पना :**

उपनिषदात आणखी एका महत्त्वाच्या मुद्याचे स्पष्टीकरण आलेले आहे. तो विचार म्हणजे ईश्वरविषयक कल्पनेचा होय. मांडुक्य उपनिषदावरील भाष्यात तत्ववेत्ते श्रीराधाकृष्णन् म्हणतात – ब्रह्म आणि ईश्वर या संबंधीचा विचार उपनिषदांनी विस्तारपूर्वक केलेला आहे. ईश्वर ही संकल्पना विश्वसापेक्ष आहे म्हणून तो विश्व निर्माता, नियमन करणारा, आणि शास्ता तसेच चर्मचक्षूंनी पाहता येण्यासारखा असा आहे. इथे ईश्वर म्हणजे ब्रह्मच ही कल्पना त्यामागे असते. मात्र ब्रह्म ही संकल्पना इथे वेगळी म्हणजे सापेक्ष असते. त्यासाठी परब्रह्म हा शब्द रूढ केला आणि ती संकल्पना या सगुण साकारतेहून भिन्न आणि स्वतंत्र आहे. ती संकल्पना निरपेक्ष आहे आणि ईश्वर ही संकल्पना सापेक्षही आहे. उपनिषदांत ही सापेक्ष कल्पना वगळली गेली आहे म्हणून जे जे सापेक्ष आहे, ते ते नव्हे. न इति। न इति। असे उपनिषदे म्हणतात. कारण उपनिषदात अंतिम सत्याचाच पुरस्कार करण्यात आलेला आहे. अंतिम सत्यच त्याना अभिप्रेत आहे. तेच त्याचे साध्य आहे. हा केवळ सगुणतेचा निषेध असे मात्र म्हणू नये. तसा निषेध केला असता तर सापेक्ष ब्रह्म म्हणजे विश्व याची रचना अस्तित्वात आली नसती. छांदोग्य उपनिषदाचे स्पष्टीकरण करताना आद्य शंकराचार्य म्हणतात – केवळ मंद बुद्धीच्या लोकानाच, एकमेव अद्वितीय, अविकारी, गुणातीत, अज, शुद्ध, नित्य मुक्त असे ब्रह्म म्हणजे शून्य असे वाटते. अंतिम सत्याच्या दृष्टीने ईश्वराची संकल्पना अतिशय क्षीण आहे. कारण अंतिम सत्यच सर्वत्र पसरलेले आहे. वेदान्ती लोकांनी निर्गुण ब्रह्म जे वर्णिले आहे त्याचा अर्थ इतकाच की, मानवी बुद्धीने त्याला जी वस्त्रे अंगावर घातलेली आहेत – उदा. गुण विकार आदींची लेणी चढविलेली आहेत त्या सर्व गोष्टींनी विरहित असलेले ते तत्त्व होय. ज्यावेळी त्या ब्रह्मावर आपल्या कल्पनेने आपण मानवी गुण लादतो व त्याची तुलना करतो, त्यावेळी आपण ब्रह्माला मर्यादित करीत असतो. म्हणजेच, त्याला मानवी रूपात पाहण्याचा प्रयत्न केला जातो. याचाच अर्थ मानवाचा हा प्रयत्न 'ब्रह्म'ला मूळ स्वरूपात पाहण्याचा नसतो. केन उपनिषदात स्पष्टपणे या बद्दलचा विचार मांडला आहे. त्यात असे म्हटले आहे की जो म्हणतो मी ब्रह्म जाणतो, तर खुशाल समजावे की त्याला ते कळलेले नाही आणि जो म्हणतो मला ब्रह्म समजलेले नाही त्यालाच ते समजले आहे असे मानावे. हा विरोधाभास नसून वरील संदर्भातून हा विचार समजून घेतल्यास हे नीटपणे ध्यानात येईल.

**अमर्याद ब्रह्म :**

सर्व मर्यादित संकल्पनेहून ब्रह्म वेगळे आहे. संपूर्ण विश्व व त्यातील घटना या स्थल, काल, कार्यकारणभाव, यांनी मर्यादित आहेत. मात्र अंतिम सत्य म्हणजे ब्रह्म या सर्वापलीकडे आहे. जे स्थळानी मर्यादित असते त्याचे विभाजन करता येते. याचमुळे त्याच्या ठिकाणी अनेक संभवते. ब्रह्माबाबतीत वेगळाच अनुभव येतो. सर्व–व्यापकतेमुळे जे इथे आहे तेच तिथे आहे. पूर्ण अद: पूर्णं इदम्। म्हणून ते अनेक नाही. ते अज आहे, कारण ते नित्य आहे. विभाग रहित म्हणून अविकारी, अनार्व म्हणून अनंत आहे. ब्रह्म कोणत्याही धर्माने युक्त नसल्याने त्याच्याशी बरोबरी कशानेही करता येत नाही म्हणून ते वर्णनातीत, अनिर्वचनीय आणि इंद्रियातीत आहे. थोडक्यात ब्रह्म म्हणजे सत् नित् आनंद होय.

**चित् स्वरूप :**

चित् म्हणजे जाणीव, स्व संवेद्यता. छांदोग्यात एक गोष्ट आलेली आहे. जनक राजा याज्ञवल्क्यांना विचारतो महाराज मानवाला प्रकाश कशाने मिळतो. याज्ञवल्क्यांना

म्हणाले सूर्यापासून मानवाला प्रकाश मिळतो. राजाने पुढे विचारले, सूर्यास्तानंतर कुणाकडून प्रकाश मिळतो. चंद्राकडून असे ऋषींनी सांगितले. राजा म्हणाला – चंद्र अस्त पावला असता कोणाकडून प्रकाश मिळतो? अग्नी कडून असे ऋषी म्हणाला. अग्नी विझून गेल्यावर कोणाकडून प्रकाश मिळतो? या प्रश्नाला चटकन् उत्तर देणे बंद झाले. आता याज्ञवल्क्यांना खरे उत्तर द्यावे लागले. इथे आत्माच प्रकाश देतो, तो आपल्या प्रकाशाची किरणे विस्तारित करतो. आत्मा म्हणजे अंतर्यामी असलेली अमर्याद जाणीव आहे. गाढ निद्रेत कोणतीही जाणीव नसते. पदार्थ व देह याचेही या अवस्थेत भान नसते तरी तो संज्ञारहित आहे असे म्हणता येणार नाही. ते अंतर्यामी सर्वसाक्षी सर्व जाणीवेचेही जाणीव असलेला तोच आत्मा होय. इंद्रिय ही त्याची केवळ उपकरणे आहेत ज्योतिषां ज्योति: असे त्याचे वर्णन केले जाते. आत्मस्वरूप चिन्मय असल्याचे ध्यानात येते.

(क्रमश:)

**श्री. शं. बा. मठ**
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे – ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३५२०३०

●●●

(पान क्र. ९ वरून)

**बालशिक्षणातील संगीत व नाट्याचा वापर**

लक्षात ठेवा, सादरीकरणाला एखाद्या गोष्टीप्रमाणे सुरुवात असावी. मग धड्याचा अध्यायनाचा भाग म्हणजे गाभा असावा जो संवाद किंवा व्यक्तिचित्रणातून स्पष्ट व्हावा. मग विषयाच्या सारांशाकडे यावं आणि हळूच शेवट करावा. सादरीकरणानंतर मुलांशी चर्चा करा.

अशा प्रकारे, संगीत आणि नाट्याचा जर शिक्षण प्रक्रियेमधे समावेश असेल तर पुढील सर्व पिढ्या या गुणवंत आणि आत्मविश्वासूच घडतील.

(*आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवरून प्रसारित झालेल्या व्याख्यानाचे हे लेख रूप आहे. आकाशवाणीच्या सौजन्याने ते मुद्रित करीत आहोत – संपादक)

**सौ. विशाखा देशपांडे**
सौ. आनंदीबाई जोशी
इंग्रजी माध्यम शाळा,
नौपाडा, ठाणे.

● ● ●

**वीजबचत करणारे टीव्ही लवकरच बाजारात**

जगभरात विजेचे वाढत जाणारे संकट तसेच वीज वापरामुळे वाढत असलेले पृथ्वीवरील तापमान कमी करण्यासाठी वीजबचत करणारे दूरचित्रवाणी संच लवकरच बाजारात येणार आहेत. २०११ पर्यंत हेच संच बाजारपेठेत येतील, असा कायदा अमेरिकेत करण्यात येणार आहे. जगभरात तयार होणाऱ्या एकूण विजेतील दहा टक्के वीज दूरचित्रवाणीसाठी वापरण्यात येत असल्याची आकडेवारी कॅलिफोर्निया विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी दिली आहे.

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

श्री. साने यांच्या लेखमालेतील पुढील लेख येथे देत आहोत.


**प्रास्ताविक :**

दिशाच्या नोव्हेंबर व डिसेंबर २००९ च्या अंकात आपण '**सरस्वती**' ह्या ऋग्वेदीयन संकल्पनेची चर्चा केली. '**सत्य' ज्ञान** म्हणजे काय? '**Reality**' म्हणजे काय? '**Absolute Reality**' म्हणजे काय? '**चिरंतन सत्य**', म्हणजे काय? वगैरे- तसेच '**अपराविद्या**', '**पदार्थ**' ह्या संकल्पना व त्या प्रत्येकाच्या अर्थाची प्राप्ती होण्यासाठी होणारे प्रयत्न (जगाच्या) इतिहासात, योगी, संत वगैरे कडून कसे झाले हेही संक्षिप्तपणे पाहिले.

**माझी एक थियरी :**

पण, माझी व्यक्तिगत अशी एक 'थियरी' आहे. मानवी ज्ञानाच्या अफाट पसाऱ्याचे दर्शन आजपर्यंत झाले, तरी त्याला 'सत्य' ज्ञान गवसले आहे, असे आपण म्हणू शकत नाही. सगळ्या ज्ञानात 'आत्मज्ञान' हे श्रेष्ठ, दुरापास्त पण आवश्यक आहे, पण, ते अवघड आहे आणि त्याच्या प्राप्ती करता मानव अनेक मार्ग धुंडाळतो आहे. हेही तितकेच खरे आहे. हे 'आत्मज्ञान नसले किंवा स्वत: कोण आहोत, काय आहोत याचा पत्ता नसणे हा अनर्थ होय!! मग बाकी ज्ञानाच्या कल्पना काय कामाच्या? पण, मानवाचा '<u>सध्याचा प्रयत्न</u>' हा एका ढोबळ अर्थाने केवळ '<u>भौतिकवादी</u>' पद्धतीचा आहे. शिवाय त्यांतही निरनिराळ्या 'ज्ञानमार्गाचा' गलबला आहेत. हे भौतिकवादी ज्ञान म्हणजे न शेंडा ना बुडखा असेच आहे. त्रिशंकू सारखे!! तरी पण, ह्या 'भौतिकवादी' ज्ञानमार्गाला सुद्धा कमी लेखून चालणार नाही. कारण, त्यात आपल्या समोर चालणाऱ्या विश्वाच्या कारभाराचा अभ्यास व चाचणी व इंद्रियांमार्फत प्रत्यय घेण्याच्या अनेक कामगिऱ्या चालू आहेत. तरीही 'सत्य ज्ञान' अजूनही कित्येक योजने दूर आहे!!

माझी 'थियरी' अशी आहे की, ह्या नश्वर जगाच्या अभ्यासाला एक प्रतीकांचा '**<u>Symbolism</u>**' चा अभ्यास असेही म्हणल्यास चालेल व तरीही अपरिहार्यपणे त्यातील 'तर्कवाद, नियम व अनुभव यांच्या जोरावरच गूढ, अगम्य व अव्यक्त जगांतल्या बीज संकल्पनांचे ज्ञान शोधावे लागले. पण, आपल्या ज्ञानाची सुरुवात ह्या 'बालवाडींतच' होऊ शकते. मर्यादित बुद्धी, शहाणपण व आयुष्य या बेगमीवरच पुढचा सत्य ज्ञानाचा यज्ञ होऊ शकतो!! त्यामुळे हा 'भौतिकवादी अभ्यास' जरी 'भ्रमात्मक असला तरीही अपरिहार्य व आवश्यक आहे. तरी हा आपला आवश्यक असा 'Data' आहे. प्राथमिक





माहितीवजा आहे. पण, तो सुद्धा सीमित ज्ञानाचाच अनुभव

देत असल्याने, त्यातील 'अपूर्णतेची जाणीव' ध्यानात घेऊन - ज्ञानाचे इतर मार्ग चोखाळावे लागतील. प्रत्येक वेळी, प्रत्येक पायरीवर मिळवलेल्या ज्ञानाच्या गुणवत्तेची चाचणी करावी लागेल. प्रचलित ज्ञानपद्धती जोखाव्या लागतील.

**'Kenneth Burke Symbolism' :**

या माझ्या थियरीला एक अप्रतिम जोड **Kenneth Burke** ह्याच्या पुस्तकातून मिळाली. माझ्याकडे हे पुस्तक नाही, मी ते पूर्ण वाचले नाही. '**Language as sumbolic Action (1966)**' या त्याच्या पुस्तकावरचा एक छोटा अभिप्राय मला मिळाला व अत्यंत आवडला. त्याचे थोडे स्वैर भाषांतर मी दिशाच्या वाचकांकरिता मुद्दाम येथे देत आहे.




**Kenneth Burke**

**भाषेच्या मार्फत सत्यज्ञान (Reality) :**

''माणूस हा स्वभावत:च प्रतीकांच्या भाषेला अनुकूल व संवादक्षम असल्याकारणाने, बर्कसाहेब यांनी भाषेची (अलंकारी स्वरूपाची) 'व्याख्याच' मुळी, एका तऱ्हेची 'प्रतीकांच्या माध्यमातून सहकारी तत्त्वांची स्पंदने उत्पन्न करण्याची क्षमता असलेले एक माध्यम, अशी केली आहे. केन बर्क यांनी 'माणसाची व्याख्या सुद्धा' 'प्रतीक वापरणारा, निर्माण करणारा त्यांचा वापर वा गैरवापरही करणारा प्राणी', अशी केली आहे. तो नकारात्मकतेचाही संशोधक आहे आणि त्याच्या मूळ नैसर्गिक 'स्वभाव व रूप' या अस्तित्वापासून स्वत:च निर्मिलेल्या कृत्रिम वातावरण, साधन व यंत्र सामग्रींनी फार दूर गेलेला आहे. उच्च नीचतेच्या धर्म, जाती, वंश, श्रेष्ठत्व या संकल्पनांनी बांधलेला व श्रेष्ठत्वाच्या व पूर्णत्वाच्या अट्टाहसाने जडावलेला व भारलेला झाला आहे. केनेथ बर्क यांच्या मताने या आपणच निर्मिलेल्या प्रतीकांच्या कोळीष्टकांच्या प्रभावाखाली दबून गेल्याने मानवाची पुष्कळशी संकटे त्यावर ओढवलेली आहेत. त्यांनीच निर्मिलेल्या प्रतिकांच्या संकल्पनांचा तो स्वत:च बळी ठरला आहे.

**केनेथचे तत्त्वज्ञान व पेंटाड (Pentad) :**

केनेथ बर्कच्या फिलॉसॉफीमध्ये 'पेंटाड' (Pentad) ही नवीन संकल्पना आहे. सामाजिक अंत:प्रवाह, संवाद हे पेंटाड पूर्णपणे समजावून घेतल्यावर उकलतात. त्याची उपांगे म्हणजे-

१) Act - कृती

२) Scene - दृश्य

३) Agent - हस्तक, प्रतिनिधी

४) Agency - प्रतिनिधिक संस्था, संप्रदाय

५) Purpose - उद्देश, ध्येय

त्याचे महत्त्वाचे म्हणणे असे आहे की, समाजातील सगळ्या घडामोडी व घटना या एक तऱ्हेची नाट्यमय कृतीच असते. त्या घटनांचा परिणाम किंवा फळ, हे ह्या ५ तऱ्हेच्या पेंटाडच्या, आपआपसातल्या नात्यांवर व अंत:प्रवाहावर अवलंबून असतात. हा प्रकार एक तऱ्हेचा 'नाट्यमय पेंटाड' म्हणता येईल.

**'अंतिम पडदा' :**

हे लक्षात घेतल्यावर केनेथ बर्कची मुख्य कल्पना

सत्कार्याकडे प्रवृत्त होणे हा गुण शुद्ध मनाचा आहे, हिशेबी मनाचा नाही.

म्हणजे 'Terministic Screen' म्हणजे '**<u>अंतिम पडदा</u>**'. हा पडदा किंवा कॅनव्हास हा एक विवक्षित प्रतिमांचा गट बनतो व ह्या पडद्याची दुर्बिण किंवा चष्मा ही त्या त्या वेळच्या समाजाची बौद्धिक धारणा होऊन जाते. पक्की, निश्चित व ठोस अशी व मानवी समाज ह्या विवक्षित पडद्यावरच विश्वाची सत्यता पडताळून पाहू लागतो. एक तऱ्हेचे अंतिम सत्य म्हणून!!

भाषा व तत्त्वज्ञान या मधील नाते मग नवीन आकार घेते. भाषा ही केवळ सत्यतेचे चित्र दाखवीत नाही व थांबत नाही तर **<u>सत्याची निवड सुद्धा करते</u>** व धक्कादायक सत्य म्हणजे **<u>सत्याचाच विपर्यास सुद्धा करते</u>** !!!

याचा सरळ सरळ एक अर्थ की, इतर प्राण्यांप्रमाणे जरी मानवाची सुरुवात, सत्य भावना म्हणजे समोर दिसते तेव्हढेच इंद्रियांना समजणारे जग एव्हढेच न रहाता, त्यानेच निर्माण केलेल्या जाळ्यांचा तो गुलाम बनतो. नंतर ह्या प्रतीकांच्या, संकल्पनांच्या, तत्त्वज्ञानाच्या, कथा, इतिहास, पुराणे, गोष्टी, संस्कार, श्रद्धा, विश्वास वगैरे वगैरे व त्या त्या समाजाने, राष्ट्राने, धर्माने जतन केलेल्या **<u>Symbolisms Network & Screens</u>** **<u>प्रतीकांच्या, जाळ्यांचा, तो गुलाम होऊन जातो</u>**. या 'अंतिम वेगवेगळ्या पडद्यांनाच' तो '**<u>सत्याची पातळी</u>**' प्रदान करतो, व हेच तो आजपर्यंत करत आला आहे!!

त्यामुळे ह्या स्वनिर्मित जाळ्यांतून, पडद्यातून, बुरख्यातून त्याची कशी सुटका होईल, हा खरा '<u>सत्यज्ञानाबद्दलचा सवाल</u>' आहे!!

**''<u>Human Thought Constructs</u>'' :**

शिवाय, ही जाळी व '**<u>Terministic Screens</u>**' '**<u>अंतिम पडदे</u>**' अनेक क्षेत्रातही आपला अजगरी विळखा घालून कुंभकर्णी निद्रासुख घेत पहुडलेले आहेत. ही जाळी, हे पडदे 'Human Thought Constructs' म्हणजे मानवी विचार व बुद्धी निर्मित चीज आहेत हे तो विसरतो!!

उदाहरणार्थ, अनेक धर्म व त्यांचे विश्वास कीं ते ज्या प्रतीकांवर, कृत्रिम स्वप्न विश्वास कथांवर आधारलेले आहेत.

जसे अनेक धर्म ख्रिश्चॅनिटी, इस्लाम, बुद्ध, जैन, ज्यू, पारशी, शीख वगैरे.

अनेक वंशभेद जसे नीग्रो, युरोपियन, पीतवर्णी चीनी, जपानी वगैरे.

जसे, अनेक तत्त्वज्ञाने मार्क्सिझम, सोशॅलिझम, कॅपिटॅलिझम, फ्री मार्केट कॅपिटॉलिझम, फ्रॉईडीझम, जंग सायकॉलॉजिस्ट.

जसे अध्यात्मवादी, पारलौकिकवादी, स्वर्गवादी, कयामतके दिनवादी, काफर व जिहादवादी, अॅडम व ईव्हवादी.

आणि किती आणखी असंख्य प्रतिके सांगू?

प्रचंड गदारोळ माजला आहे या प्रतीकांचा व संकल्पनांचा गोंधळच आहे व आपण त्यात प्रचंड मूर्ख (की) (बुद्धीवान) गोंधळी नाचतो आहेत!!

या प्रत्येक गोंधळ्यांचे स्वतंत्र मोहक व आकर्षक तत्त्वज्ञान व श्रद्धांचे 'बंडल' आहे व ते स्वतःवर लादून घेण्यात व त्या जाळ्यांत हातपाय आपटण्यात ह्या 'मर्त्य (कोळी) मानवाचे' जीवन 'सत्याच्या विपर्यासाचाच' अनुभव घेत आहेत. सतत दमत आहेत. श्वासाच्या अंतापर्यंत!!

**Escape Route? :**

मग प्रश्न पडेल की यातून सुटका कशी होणार? ह्या प्रश्नाचा गंभीर विचार अनेक संस्कृत्या, धर्म, तत्त्वज्ञान, विज्ञान, सायकॉलॉजी वगैरे प्रकारात जगभर झाला आहे

व चालूही आहे. पण, त्याला खऱ्या अर्थाने यज्ञ प्राप्त झालेले नाही. उलट, ह्या वेगवेगळ्या 'मानवी प्रयत्नांना' त्या मानवाच्याच तर्क पद्धतीची कोळीष्टिके व मर्यादा आहेत. त्या मर्यादा व तुटी त्याल जाणवत नाहीत व त्याचे तुटपुंजे आयुष्य या एखाद्या प्रभावी ज्ञान-सत्यज्ञान पद्धतीचे सांप्रदायिक अनुयायी होऊन अज्ञातजगतातच संपते. हा एक दैवदुर्विलास आहे.

ह्याला एक तेजस्वी उत्तर आहे ते म्हणजे आपल्या भोवतालच्या जगात ज्या तऱ्हेच्या प्रत्यक्ष व्यवहाराच्या घटना होतात त्यांच्या 'दर्शनी' स्वरूपाच्या मागे सर्वसाधारण बुद्धीला भ्रम घालणारे झिरझिरित पडदे ओळखणे व त्यांचा '**परदाफराश**' करणे.

या व नेमक्या याच ठिकाणी बर्क यांची थियरी आपल्याला मदत करू शकते. त्यांची 'Terministic Screen' ही संकल्पना नवीन नाही, पण हा 'अंतिम पडदा' ज्या भाषेच्या ज्ञानमार्गामुळे व (Symbolism) प्रतीकवादाच्या प्रभावाने निर्माण होतो, त्याचे क्रमवार व सुसंगत वर्णन त्यांनी केले आहे. त्यामुळे, धुके नाहीसे करणाऱ्या सूर्यप्रकाश सारखे त्याचे महत्त्व जाणवते.

ह्या पूर्वीही ह्या भौतिक जगातील दर्शनाच्या सत्यतेबद्दल शंका घेणारे महात्मे निर्माण झाले अद्वैत तत्वज्ञानातील 'मायावाद' हा याच भौतिक दर्शनाच्या (प्रतीकात्मक) सत्यतेबद्दल शंका घेत आला आहे.

पण, त्याचा परिणाम म्हणजे ह्या दर्शन देणाऱ्या भौतिक जगाचाच धि:कार करणे किंवा त्यातील जीवन व्यवहाराकडे धि:काराने पहाणे व दुर्लक्ष करणे किंवा सरळ सरळ त्यापासून पलायन करणे, संन्यास घेणे हा झाला आहे हे सगळे दुर्दैवी आहे. सत्यज्ञानाच्या प्रयत्नात ह्या भ्रमात्कम पडद्यांच्या भ्रमाचा निरास हे प्राथमिक स्वरूप होय. ब्रह्मज्ञान किंवा सत्यज्ञान, आत्मज्ञान व आत्म्याचा उद्धार ह्या क्रिया पूर्ण व्हावयाला अजून मोठी मार्गक्रमणा चालावी लागणार आहे.

ह्या प्राथमिक साक्षात्कारी भौतिक दर्शनाच्या भ्रमात्मक सत्य दर्शनाच्या 'ह्या जगाची' निर्मिती काही संयुक्तिक व आवश्यक कारणांनी झाली असावी व ते कारण शोधणे आवश्यक आहे. ह्या निष्कर्षाला हे अद्वैतवादी न येता ते ही 'भौतिक जीवन संधी' जवळ जवळ नाकारण्यातच दवडतात. अगदी कडक शब्दात त्यांना ''School Drop outs'' असे म्हणावेसे वाटते. हे जग एक आवश्यक साधन सुद्धा आहे. आपल्याला पूर्ण ज्ञान प्राप्त होण्यासाठी. कसे ते पाहूच!!

ह्या उलट, भौतिक विज्ञानवादी ह्या भौतिक व्यवहाराच्या मर्त्य अस्तित्वातील भुलभुलैय्या अशा भोगवादी जीवनालाच आदर्शत्व व सत्यता देऊन त्या भोगांची वृद्धी करण्यात व अंतिम भोगअतृप्तीच्या भोवऱ्यात नाश पावण्यात धन्यता मानतात किंवा इतिश्री पावतात.

केनेथ बर्कच्या थियरीचा फायदा हा होऊ शकतो की, ही प्रतीके Symbols म्हणजे नक्की काय? ह्या प्रतीकांच्या (Pentad) पेंटाडची क्रिया माणसावर कशी क्रिया परिणाम वा काम करते?

आपल्याला इंद्रिय गोचर होणारे हे भौतिक जग सुद्धा काल 'Time' ह्या शक्तीच्या प्रभावाखाली येते. त्यालाही मृत्यू वा अंत आहे. तसेच ह्या जड प्रकृतीमध्ये होणारे जीवन प्रवाह सुद्धा कालबद्ध व कालाच्या जीवन मर्यादित बांधलेले आहेत. त्यातील मूळ शक्तिस्त्रोत हा 'प्राण' आहे. ही प्राणशक्ती त्या जीवन व्यवहाराला चैतन्याची शक्ती व पुरवठा करते. हा प्रवाह त्याच्या गूढ मर्यादेत बांधलेला असल्याने तो खंडित झाल्यावर ह्या प्रकृतीत 'प्रत्यय' व मृत्यू होतो. म्हणजे, एक प्रकारे हे जगच एखाद्या रंगभूमीवरच्या नाट्य प्रयोगासारखे असते. त्याचा प्रेक्षकही 'मर्त्य जीव' व त्या नाटकातील पात्रे त्याच मर्त्य जातीची व घटना व भावनांचे खेळ, हे सुद्धा एका मर्यादित

नाटकासारखे. भौतिक जड अस्तित्वातून भासणारे व नाहीसे होणारे!!

**जग ही एक नाट्यशाळा :**

मग ह्या पृथ्वीवरील जीवन व्यवहारालाच जर एक 'मोठे नाटक' व 'नाशिवंत भावविश्व' म्हटले तर वावगे ठरणार नाही. पण, मग त्याच्या आजच्या आपल्यासमोरच्या अस्तित्वाला सत्याचे Reality चे कोणते मापदंड लावणार व सत्याच्या कोणत्या पातळीचे सर्टिफिकेट देणार?

हे सर्वच एक Symbolistic प्रतीकात्मक दर्शन असू शकेल काय? हे पाचही पेंटाड एका विवक्षित पडद्याचीच बांधणी करीत असतील काय? ह्या अशा जीवन नाट्याचे प्रयोजन काय असावे. त्याचा लाभ्यार्थी कोण? त्याची 'Reality' कोणती?

ह्या नाट्यप्रकारातील ज्ञाता कोण व ज्ञान देणारे कोण व ह्या ज्ञानाची जात कोणती? ह्या बद्दलचे नकारात्मक उत्तर जवळ जवळ प्रत्येक धर्माने कमी अधिक प्रमाणात दिले आहे.

भौतिक विज्ञानाने ह्या प्रश्नाचे उत्तर भविष्यातील पारड्यात टाकले आहे. ते प्रयत्नशील आहेत ह्याची ते ग्वाही देतात, पण दिशा स्पष्ट नाही, ह्या भ्रमाच्या पडद्याबद्दल म्हणूनच ते पूर्ण ज्ञानी वा जागरूक नाहीत, असे दिसते!!

त्यांचा Methodology प्रयोग पद्धतीवर मात्र विलक्षण अविचल विश्वास आहे. थोडक्यात 'श्रद्धा' आहे. हा शब्द त्यांना आवडणार नाही. ते मानतात की त्याचे प्रयत्न Sequential Successive falibility म्हणजे क्रमात्मक सोपानमार्गी चुकातून नवनवीन व पुढच्या चुकांकडे व नव्या प्रमेयांकडे प्रवास करतात. पण, सध्याच्या स्वत:च्या 'भौतिक वैज्ञानिक दर्शनाला' मात्र Exclusive (म्हणजे इतर ज्ञानपद्धतींना झुगारून)'श्रद्धायुक्त' स्वत:च्याच चालू ज्ञानपद्धतीला संपूर्ण मान्यता देतात.

**एकात्म ज्ञानपद्धती :**

हे मानवजातीने गंभीरपणे तपासून पहाण्याची वेळ आली आहे, असे आता वाटू लागले आहे!! मानवी समाजाला अशा एकांगी व अहंकारी ज्ञानपद्धतीला नवीन Integral Epistemology म्हणजे 'एकात्म ज्ञानपद्धती' ची नितांत जरूरी आहे!!

दिशाच्या पुढच्या अंकात याचा विचार करू या.

**श्री. यशवंत साने**

सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

●●●

दिशा नियमित वाचा.

आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.

वेळीच धैर्य दाखवले तर संकटाला तोंड देता येते.

# चंचलता

*चंचलता हा दुर्गुण आहे. तसाच तो गुणही ठरू शकतो. फक्त या चंचलपणाचा उपयोग नीट व्हायला हवा, असा वेगळा विचार देणारा लेख - संपादक*

चंचलता हा गुण प्रत्येक व्यक्तीमध्ये असलेला आपणांस दिसून येतो. हा गुण लहान वयात, तारुण्यात तसेच वृद्धापकाळातही दिसून येतो. जिच्या अंगी चंचलपणा असतो अशी व्यक्तीच आपल्या ध्येयापर्यंत लवकर पोहोचते आणि सफल होते. म्हणून प्रत्येक व्यक्तीने नेहमी चंचल असायला हवे. परंतु माणसाचा चंचलपणा हा गुण बालवयात, तारुण्यात आणि वृद्धापकाळात त्यांच्या शरीरामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी किंवा शरीराच्या वेगवेगळ्या भागात असल्याचा आपणास दिसून येतो.

बालवयात चंचलता हा गुण बालकाच्या पायात असलेला दिसून येतो. लहान मुलांकडे आपण केव्हाही पाहिले तरी ती इकडून तिकडे उड्या मारत असलेली दिसून येतात. आपण रस्त्यावर त्यांच्यासोबत चालतो त्यावेळी ती मुले नेहमी धावत आपल्या पुढे जात असतात. मध्ये-मध्ये आवाज देऊन त्यांना थांबवावे लागते. एखाद्या सत्संगात किंवा कीर्तनाच्या ठिकाणी आपण लहान मुलांना घेऊन गेलो तर ती मुले एका ठिकाणी न थाबंता आपल्यापासून केव्हा दूर जाऊन उड्या मारून पुन्हा आपल्याजवळ केव्हा येऊन बसतील, हे आपणास समजतही नाही. आपल्या घरीही असेच असते. मुले कारण नसताना उड्या मारत असल्याची आपणांस दिसून येतात. अगदी मूल घरात एकटे असले तरी ते आपणास उड्या मारत असल्याचे दिसून येते. म्हणजेच चंचलता हा गुण बालवयात त्यांच्या पायात असल्याचे आपणास दिसून येते. म्हणून याच वयात त्यांच्या पायांना आपण योग्य दिशा द्यायला हवी. जेणेकरून प्रगतीच्या शिखरावर ती सहजपणे पोहोचतील.

तरुणपणात हीच चंचलता व्यक्तीच्या सर्वांगमध्ये दिसून येते. शरीराच्या प्रत्येक अवयवामध्ये जोश असतो, उत्साह असतो. लाथ मारेन तिथे पाणी काढण्याची क्षमता त्यांच्या अंगी असते. कोणतेही काम अगदी जोशामध्ये (उत्साह) केले जाते. पण तारुण्यात आपल्या अंगी जसा जोश असतो त्याचप्रमाणे होशही असायला हवा. आपण कार्य करीत असताना केवळ ताकद किंवा जोश उपयोगी ठरत नाही तर होशपूर्वक केलेले कामच सफल होत असते. माणसाचे तरुणपण हे असे असते की, या वयातच आपला पाय घसरण्याची शक्यता असते. वाममार्गाला लागण्याचे हेच वय असते. म्हणून कोणत्याही क्षणी पाऊल पुढे टाकत असताना ते जोशपूर्वक आणि होशपूर्वक टाकले पाहिजे.

वृद्धापकाळात किंवा म्हातारपणी ही चंचलता माणसांच्या जिभेमध्ये दिसून येते. कारण या वयात माणसाला शरीराचा कोणताही अवयव साथ देत नाही. दिवसेंदिवस सर्व अवयव निकामी होत असल्याचे दिसून येतात. चंचलता दिसून येते ती केवळ जिभेवरच. घरातील वृद्ध व्यक्तीकडे पाहिल्यास आपणास दिसून येते की, अगदी लहान-लहान गोष्टीवरून त्यांची बडबड चाललेली असते. आपल्या मुलाला किंवा सुनेला सल्ले देण्याचे त्यांचे काम सुरू असते. हे करू नकोस, ते करू नकोस, हे बरोबर नाही, ते चांगले नाही वगैरे वगैरे. शेवटी बाबा थोडे गप्प बसाल का? किंवा जरा बडबड कमी करा अशा प्रकारचे शब्द मुलांकडून ऐकून घ्यावे लागतात. कोणत्या वेळी काय बोलावे आणि काय बोलू नये याचे भानही कित्येकदा त्यांना नसते. बऱ्याचवेळा अशी परिस्थिती निर्माण होते की, घरी

आलेल्या पाहुण्यासमोर हा काही बडबडू नये म्हणून त्यांना मुले तोंडावर बोट ठेवून गप्प बसण्याचा इशारा देतात. परंतु शेवटी मुलांची किंवा सुनेची नजर चूकवून किंवा योग्य वेळ साधून जे बोलायचे ते पाहुण्यासमोर बोलणारच. कारण त्यांच्या जिभेत एवढी चंचलता असते की, त्यांची जीभ त्यांना स्वस्थ बसू देतच नाही. त्यांच्या अशा बडबडण्याने घरातील वातावरण खराब होते. घरात त्यांचा भार वाटू लागतो. हे त्यांच्या लक्षातही येत नाही. यासर्व गोष्टी टाळायच्या असतील तर वृद्धापकाळात जिभेवर नेहमी भगवंताचे नाव ठेवावे, आपले मन भगवंताच्या प्रार्थनेत रमवावे. घरामध्ये जास्त वेळ न घालवता मंदिर, सत्संग, कीर्तन याठिकाणी जास्त वेळ घालववा. आवश्यक तेवढाच वेळ घरी द्यावा. लहान मुलाबरोबर काही वेळ घालवावा असे केल्याने वृद्धापकाळाचा भार घरी जाणवणार नाही. त्यामुळे उरलेले आयुष्य आनंदात किंवा सुखात जाईल यात शंकाच नाही.

**श्री. यशवंत माने**
अबोली, बी - १०३,
सुभाष रोड, कुंभारखान पाडा,
डोंबिवली (प.), जि. ठाणे

●●●

## ❖ दिशा ❖

- ❒ *वार्षिक वर्गणी रु. २५०/-*
- ❒ *वर्गणी संपली असल्यास कृपया नूतनीकरण करावे*
- ❒ *पत्ता बदलेला असल्यास कार्यालयास कळवावे.*

## कॉफी ---

कॉफीची चव काहीशी कडवट असली तरी कॉफीच्या झाडाला येणारी फुले मात्र गोड वासाची असतात. कॉफीमध्ये असलेले कॉफीन हे द्रव्य तन-मनाला उत्तेजित करते. जगभरातील लोकांचा विचार करता कॉफी हे एक नंबरचे आवडते पेय असल्याचे दिसून येते.

कॉफीची झुडपे छोटी असतात. तिच्या गोड वासाच्या फुलांना नंतर गर असलेली हिरवट, पिवळट फळे लागतात. त्यांना कॉफी चेरी म्हटले जाते. या फळांमध्ये दोन बिया असतात. या बिया काढून उन्हात वाळवल्या जातात. नंतर भाजून त्यांची पूड केली जाते. हीच आपण वापरत असलेली मस्त, कडवट चवीची कॉफी पावडर होय.

कॉफीच्या जवळजवळ ६० जाती आहेत; मात्र त्यापैकी केवळ दोनच जातीच्या कॉफीबियांना मागणी असते. अरेनिका या कॉफिबियांना अधिक कडवट चव आणि वासासाठी मागणी असते. मध्य आणि दक्षिण अमेरिका आणि इंडोनेशियामध्ये ही कॉफी तयार होते.

आफ्रिकेत तयार होणारी कॉफी रोबस्टा नावाने ओळखली जाते. कॉफीचा शोध आग्नेय आफ्रिकेत लागला. सुरुवातीला कॉफीबिया जेवणात, औषधात आणि मद्य बनवण्यासाठी वापरल्या जात. पिण्यासाठी कॉफीचा वापर फार उशिरा सुरु झाला. दुधात मिसळून कॉफी पिण्याचा प्रयत्न फ्रान्समध्ये सुरु झाला. इटलीची एस्प्रेसो कॉफी प्रसिद्ध आहे. युरोप आणि अमेरिकेत १५०० वर्षांपूर्वी कॉफीने प्रवेश केला. मात्र येथे कॉफी दुधात घेण्यापेक्षा ती कोरी पिणे अधिक पसंत करतात.

संग्रहातून

●●●

पुस्तक परिचय

# ग्रंथकल्याणी : कल्याण सार्वजनिक वाचनालयाचा इतिहास

मराठी जीवनाची खास अशी जी वैशिष्ट्ये आहेत. त्यांतील एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे महाराष्ट्रातील सर्वच क्षेत्रांमधील सार्वजनिक संस्थांचे अस्तित्व हे होय! ''विविध क्षेत्रांमधील विविध संस्थांचे इतिहास लिहिले गेले तर महाराष्ट्राची, मराठी मनावर झालेल्या संस्कारांची व सांस्कृतिक जडणघडणीची एक मोठी परंपरा उलगडेल'' असे एका लेखात मी म्हटले होते. (संदर्भ – अक्षरयोगः अकोला जिल्हा एक अभ्यास. संपादक-प्रभुराम मालपेकर) त्यातही सांस्कृतिक जीवनप्रवाहाचा अविभाज्य भाग असणाऱ्या शिक्षण संस्था आणि सार्वजनिक वाचनालये यांचे इतिहास हा फार मोठा ठेवा असतो. इतिहासाचा धांडोळा घेऊन, सुसंगत व कालक्रमानुसार असे इतिहासलेखन केले जाणे हे अतिशय अवघड चिकाटीची गरज असणारे काम असते; एक आव्हान असते. संस्थेसंबंधातील लहान मोठी कागदपत्रे, दस्तऐवज, प्रलेख यांचे जतन करण्याची परंपरा आपल्याकडे नाही. या बाबींचे महत्त्व समजणारे कायकर्ते नाहीत, त्यामुळे असे सर्व साहित्य जमवणे, त्याचे परिशीलन करणे हे अवघड होऊन बसते. कार्यकर्त्यांची जुनी पिढी इतिहासजमा होण्याच्या वाटेवर असते वा झालेली असते त्यामुळे त्यांचे सहकार्य देखील दुर्मीळ होत जाते.


प्रलेखांचे, प्रलेखन शास्त्राचे महत्त्व आपल्या समाजात ज्या प्रमाणात असावयास हवे, त्या प्रमाणात नाही. अशा सुविहित प्रलेखांअभावी ही अडचण निर्माण होत असते. परंतु गेल्या काही वर्षांमध्ये या अडचणीतून मार्ग काढून अशा संस्थाचे इतिहास शब्दबद्ध करण्याचे प्रयत्न होताना दिसत आहेत. प्रलेखांच्या व इतिहासविषयक साधनांच्या अभावामुळे आपल्या अस्तित्वाची शंभरी वा त्याहून पुढील टप्पे गाठणाऱ्या सार्वजनिक ग्रंथालयांचे इतिहास लिहिले गेले नाहीत, जात नाहीत याची खंत या कार्यकर्त्यांना असते. महाराष्ट्रात शतक महोत्सव वा शतकोत्तर रौप्य महोत्सव साजरी करणारी ७५ ते ८० ग्रंथालये आहेत. यांच्या सांस्कृतिक योगदानाचा, जडणघडणीचा इतिहास लिहिला जाणे, तो अधिक अचूकपणे तयार होणे हे म्हणूनच आव्हान ठरते.

ठाणे जिल्ह्यातील मोठी ऐतिहासिक परंपरा असणाऱ्या शहरांपैकी कल्याण हे महत्त्वाचे शहर आहे. तेथील सार्वजनिक वाचनालयाचा १३० वर्षांचा इतिहास 'ग्रंथ कल्याणी' या नावाने लिहून प्रा. जितेंद्र भामरे व श्री. प्रशांत मुल्हेरकर यांनी एक फार मोठे काम केले आहे. अत्यंत तळमळ व विषयाचे महत्त्व ही दोन्ही वैशिष्ट्ये या लेखकद्वयीत असल्याने हा इतिहास ग्रंथ जास्तीत जास्त साक्षेपी व अचूक करण्याचा प्रयत्न झालेला आहे. प्रा. भामरे हे इतिहास विषयाचे प्राध्यापक असल्याने व श्री. प्रशांत मुल्हेरकर सार्वजनिक वाचनालयाचे आणि वाचनालय चळवळीतले तळमळीचे कार्यकर्ते असल्याने हे अवघड काम त्यांची सिद्ध केले आहे.

एकूण तेवीस प्रकरणांत हा इतिहासाचा पट त्यांनी मांडला आहे. 'ओठात शद्ब आले . . . शद्बांचे मोती झाले. . .' या पहिल्या प्रकरणात लेखन कला, लिपी, लिपीचा विकास, लेखनाची साधने या सर्वांचा धावता आढावा घेताला आहे. ग्रंथालय व्यवहाराच्या पार्श्वभूमीचा एक चांगला आलेख त्यांनी यातून उलगडला आहे. त्यानंतरच्या प्रकरणात 'ग्रंथलय' या संस्थेच्या इतिहासाचा आढावा येतो. (ज्ञान सागराला जपून ठेवावे' पृ. १५) अशा प्रकारे टप्प्याटप्प्याने प्रत्येक प्रकरणात विषयाशी संबंधित उपविषय उलगडत नेऊन नवव्या प्रकरणापासून कल्याणच्या वाचनालयाचा इतिहास (पृ.८८) सुरू होतो.

पार्श्वभूमीपर अशा या प्रकरणांना संदर्भ मूल्य प्राप्त झाले आहे. या प्रकरणांत पृ. ६५ ते ७१ या दरम्यान देण्यात आलेली शासनमान्य सार्वजनिक ग्रंथालयांची यादी ठाणे जिल्ह्यातील ग्रंथलय प्रेमी वाचकांना उपयुक्त ठरेल अशी आहे.

वाचनालयाचा जन्म (पृ.८८) या प्रकरणात गॅझेटिअर डिपार्टमेंटने दिलेल्या लेखी पुराव्याची प्रत प्रतिमुद्रित करण्यात आली आहे. (पृ. ९०) या वरून मूळ पुरावे मिळवणे, तपासणे, त्यांची शहानिशा करणे यासाठी लेखकांनी केलेले प्रयत्न लक्षात येतात. 'सदाशिव मोरेश्वर साठे' या प्रणात पृ. ८३, ८४ वरील हा भाग लेखकांचा या विषयाचा अनुभव व विचार स्पष्ट करणार वाटतो ''वाचनालया संबंधी अगदी आरंभीचा इतिहास तुटपुंज्या कागदपत्रावरून जुळवावा लागतो. कारण तेव्हाची कर्तबगार पिढी आज हयात नाही तसेच काळाच्या तडाख्यात तेव्हापासून सुसंगतवार ठेवलेले वाचनालयाचे दप्तर राहू शकलेले नाही. आरंभीची कागदपत्रे एखाद्या आपत्तीच्या भक्ष्यस्थानी पडली किंवा तेव्हाच्या पुढाकार घेणाऱ्या मंडळीच्या घरी पडून त्याची विल्हेवाट लागली असावी.''



**पुस्तकाचे मुखपुष्ठ**

१९३५ साली सुवर्णमहोत्सवानंतरचा टप्पा वाचनालयास आलेल्या वाईट काळाचा होता तेथपासूनचा बराचसा इतिहास हा सुसंगतरीत्या कालक्रमाच्या नोंदीसह या ग्रंथात शब्द बद्ध झाला आहे. आधुनिक जडणघडण व भविष्याचे वेध या प्रकरणातून वाचनालयाचा सद्यकाळ व आशादायी भविष्य यांची चांगली कल्पना येते.

प्र. २०३ ते २२० या भागांतील परिशिष्टांमधील माहिती ही कल्याण सार्वजनिक वाचनालयाची दृष्टिक्षेपात कल्पना येण्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. पृ. २१५-२१६ वर ग्रंथालयातील इ. स. १८०० पूर्वीच्या दुर्मीळ ग्रंथांची यादी दिलेली आहे. दुर्मीळ ग्रंथांचा अभ्यास करणारांच्या दृष्टीने ही यादी महत्त्वाची आहे. ग्रंथालयाचा सदर इतिहास तयार करण्याच्या दृष्टीने लागलेल्या संदर्भांची सूची (पृ. २१९, २०) या ग्रंथात समाविष्ट केली आहे हे ही अत्यंत उल्लेखनीय आहे. या परिशिष्टांमध्ये व्यक्तिनामसूची व संस्थानिर्देश सूची समावेशही करता आला असता असे वाटते.

अशा स्वरूपाच्या ग्रंथाची सिद्धता छाया - चित्रांशिवाय होत नाही. वाचनालयात येऊन गेलेल्या (यात लोक मान्य टिळकांचेही छायाचित्र आहे हे विशेष!) नामवंतांची, इमारतीची, समारंभाची आवश्यक छायाचित्रे ग्रंथात सामाविष्ट आहेत. पृ. १४ वर श्री. शंकर देवळालकर यांनी रेखाटलेल्या जुन्या इमारतीचे चित्रही महत्त्वाचे आहे.

एकंदरीत, सार्वजनिक वाचनालयाच्या चांगल्या इतिहास लेखनाचा एक वस्तुपाठ म्हणून सदर ग्रंथाची दखल घ्यावयास हवी. श्री. जितेंद्र भामरे व श्री. प्रशांत मुल्हेरकर यांचे व त्यांना अनेक प्रकारांनी साहाय्य करणाऱ्या सर्वांचेच या ग्रंथसिद्धतेसाठी विशेष अभिनंदन करावयास हवे. मलपृष्ठाची संकल्पना श्री. राम जोशी यांची आहे. मुखपृष्ठ उत्तम झाले आहे.

- ग्रंथकल्याणी - भामरे, जितेंद्र सुरेश व मुल्हेरकर, प्रशांत वसंत
- कल्याण, कल्याण सार्वजनिक वाचनालय, २००८
- पृ. २२०   • मूल्य - रु. २५०/- फक्त

**श्री. मोहन पाठक**
ठाणे

●●●

# सुवर्ण क्षण

*डॉ. बेडेकर विद्या मंदिराच्या माध्यमिक विभागाचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमांचा हा विशेष गोषवारा – संपादक*

**'यशस्वी होऊ या' :**

विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा.वि.) या शाळेचे २००९ व २०१० हे सुवर्णमहोत्सवी वर्ष आहे. या शैक्षणिक वर्षात माननीय मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी वर्षभरात छोटे–मोठे ५० कार्यक्रम देण्याचा संकल्प केला. सदर संकल्पातील अधोरेखित करण्यासारखे कार्यक्रम बरेच आहेत.

त्यापैकीच 'यशस्वी होऊ या' हा एक. शुक्रवार दि. १८ डिसेंबर रोजी शिक्षण क्षेत्राशी संबंधित असलेल्या श्री. राजीव तांबे यांना आमंत्रित केले होते. विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. श्री. वि. करंदिकर यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम पार पडला.

विविध पुरस्कार प्राप्त केलेले व अनेक अनुभव गाठीशी असलेल्या श्री. तांबे यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांना काही सूत्रे सांगितली. ती अशी–

१) अज्ञान लपवू नका.

२) समजले नसल्यास विचारण्यास लाजू नका.

३) कोणाचेही निष्कारण दडपण घेऊ नका.

४) स्वतःला कमी लेखू नका.

५) सकारात्मक विचार सकारात्मक रिझल्टस् देतात.

६) आपल्याच चुका आपल्याला घडवीत असतात.

७) स्वसामर्थ्याबद्दल साशंकता नको.

८) स्वतःशी दोस्ती करा.

अशा प्रकारे सकारात्मक टीप्स् देत देत त्यांनी मुलांना जीवनभरासाठी एक मंत्र दिला–

१) मी जसा दिसतो तसा नाही.

२) माझ्यात प्रचंड ताकद आहे.

३) मी जे ठरवतो ते मी करतोच – आत्ता पासून

विनोदाची झालर लावीत वास्तवची जाण देत देत, उपस्थितांच्या मनाची पकड घेत हसत खेळत त्यांनी मुलांना आपलंस केलं.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. मुख्या. सौ. उषा कळमकर यांनी केले, सूत्र संचालन सौ. सुमिता माने तर आभार प्रदर्शन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले.

प्रस्ताविकात मा. मुख्याध्यापिकांनी मुलांना सद्‌गुणांची जोपासना करुन आळस झटकून टाकून, प्रयत्नांची कास धरून, जीवनात यशस्वी कसे होता येते, हे पटवून सांगितले.

**'अभ्यास मुलांचा/मुलांसोबत' :**

सदर संकल्पातील 'अभ्यास मुलांचा/मुलांसोबत' हा एक कार्यक्रम.

शनि. दि. १५ डिसेंबर रोजी शिक्षण क्षेत्राशी संबंधित असलेल्या श्री. राजीव तांबे यांना आमंत्रित केले होते. विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ अनुभवी सदस्य श्री. श्री. वि.

करंदीकर यांच्या अध्यक्षतेखाली सदर कार्यक्रम पार पडला. विविध पुरस्कार प्राप्त केलेले व अभ्यास क्रमाच्या राष्ट्रीय धोरणाशी संलग्न असलेली श्री. राजीव तांबे यांनी मुलांच्या यशात पालकांचा सहभाग किती महत्त्वाचा असतो हे पटवून सांगीतले. सदर पालक प्रबोधनात त्यांनी पुढील प्रमाणे आपले विचार मांडले.

पालकांनी आपल्या पाल्याला शिकण्यात गोडी वाटेल असे पोषक वातावरण निर्माण केले पाहिजे. आपले बालपण व मुलांचे बालपण याची तुलना करू नये. पालकांनी मुलांच्या भावनांशी सहमत व्हावे, पण त्यांच्या मताशी सहमत होऊ नये.

पाल्याच्या यशात व अपयशात पालकांनी सहभागी झाले पाहिजे हा महत्त्वाचा विचार त्यांनी दिला. तसेच मुलांना शिकवायचे नाही तर मुलांच्या सोबत शिकायचे. मुले ही मातीचे गोळे नाहीत तर ते प्रचंड ऊजेचे स्त्रोत आहेत.

Never lebel your child - मुलाला काय येत नाही हे सांगू नका, येते हे सांगा.

कार्यक्रमाचे प्रास्तविक मा. मुख्या. सौ. उषा कळमकर यांनी केले. सूत्र संचालन सौ. सुमिता माने तर आभार प्रदर्शन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले.

प्रास्तविकात मा. मुख्याध्यापिकांनी पालकांनी जागरूक राहण्याचे आवाहन केले. मुलांचे मित्र, मुलांचा आहार, मुलांच्या सवयी याविषयी काळजी घेऊन त्यांच्यावर संस्कार घडतील या कडे विशेष लक्ष देण्यास सांगितले.

**'कथ्थक नृत्याविष्कार' :**

या कार्यक्रमांतील एक म्हणजे कथ्थक नृत्यविष्कार हा होय. रविवार दि. २० डिसेंबर रोजी अनेक पुरस्कार प्राप्त केलेल्या आपल्या कर्तृत्वाचा ठसा परदेशातही उमटविलेल्या नाशिककर मंडळीने शास्त्रशुद्ध कथ्थक नृत्याचा सदाबहार कार्यक्रम सादर केला. सादरकर्त्या होत्या सौ. रेखा नाडगौडा व सौ. अदिती पानसे (कीर्ती कलामंदिर, नाशिक)

'गदिमांचे कृष्णायन' व 'ज्ञानदेवाचे भजे ज्ञानदेवं' हा नृत्याविष्कार सादर केला. उत्तम पदन्यास, भावोत्कट मुद्राभिनय, साजेशा हस्तमुद्रा याद्वारे अतिशय भावपूर्ण असा कार्यक्रम सादर केला.

कोणत्याही क्षेत्रातील कला ही आत्म्यातील दैवी शक्तीचे प्रकटीकरण असते. याची साक्ष नृत्याविष्कार पाहताना पटली. जो नृत्याची शक्ती ओळखतो त्याचे ठिकाणी ईश्वर वास करतो याचा अनुभव आला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. मुख्या. सौ. उषा कळमकर यांनी केले. सूत्र संचालन सौ. सोमण बाई तर आभार प्रदर्शन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले.

प्रास्ताविकात मा. मुख्याध्यापिकांनी 'कीर्ती कला मंदिर नाशिक' या संस्थेच्या प्रगतीचा वाढता आलेख श्रोत्यांपुढे ठेवला.

**झुंबड :**

सोमवार दि. २१ डिसेंबर रोजी सादर झालेला झुंबड हा कार्यक्रम म्हणजे याच मालिकेतील एक होय.

करी मनोरंजन जो मुलांचे,
जडेल नाते प्रभुशी तपाचे ।।

या वचनाची साक्ष देणारा ठरला.

अनेक प्रकारचे ललित लेखन, काव्य संग्रह, कादंबरी, नाटके, कथासंग्रह व बालकविता लिहिलेले, अनेक पदभार सांभाळणारे, एक व्यासंगी व मुलात रमणारे व्यक्तिमत्त्व म्हणजे नाशिकवासी श्री. किशोर पाठक! व्यवसायाने Civil Engineer, पण मुलांच्या विश्वात रमणारे असे हे व्यक्तिमत्त्व!

त्यांनी आपल्याबरोबर कविता गायला लावून कार्यक्रमात एक प्रकारचे चैतन्य निर्माण तर केलेच पण मुलांना भरपूर आनंद दिला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. मुख्या. सौ. कळमकर यांनी केले तर सूत्र संचालन सौ. संध्या झंझाड यांनी केले व आभार सौ. सुनीता देशपांडे यांनी मानले.

प्रास्ताविकामध्ये मा. मुख्या. यांनी 'मातीचं देणं' काय असते हे सांगितले. नाशिकचे संस्कार कसे कायम स्वरूपी व्यक्तिमत्त्वामध्ये रुजले गेले आहेत हे सांगितले.

**'वैनतेय' :**

मंगळवार दि. २२ डिसेंबर रोजी स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या मृत्युंजयी जीवनावर आधारित चरित्रगायनाचा कार्यक्रम सौ. सुजाता सोमण व त्यांच्या सहकारी भगिनी यांनी सादर केला. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे तबला व हार्मोनिअम ही साथ देखील महिलांचीच होती.

सावरकरांच्या जन्मापासून ते त्यांनी केलेल्या प्रायोपवेशनापर्यंतच्या सर्व भागावर आधारित गायनाचा उत्कृष्ट कार्यक्रम सादर केला. वीर, वात्सल्य, शृंगार, करुण अशा विविध रसांची बरसात करीत दोन तास त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले. सावरकरांचे हिंदुत्व, त्यांनी केलेली हिंदुत्वाची व्याख्या यावर आधारित गीते सादर केली.

उत्तम निवेदन, त्याला चढवलेला उत्कृष्ट संगीत साज, सहज लक्षात राहतील अशा प्रसंगोचित चाली लावून अनादि अनंत असलेली ही गरुड झेप 'वैनतेय' सादर करून बालमनावर देशभक्ती व देशप्रेम यांचा संस्कार केला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. मुख्या. सौ. उषा कळमकर यांनी केले. सूत्र संचालन सौ. मीरा लिमये यांनी केले व आभार प्रदर्शन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले.

प्रास्ताविकात मा. मुख्याध्यापिकांनी आपल्या लहानपणी सावरकरांना पाहून आपल्या मनावर सावरकरांच्या विचारांचा कसा परिणाम झाला हे सांगितले.

**वार्षिक स्नेहसंमेलन २००९-१० :**

विद्या प्रसारक मंडळाचे डॉ. बेडेकर विद्या मंदिर (मा. वि.) या शाळेचे दि. २३/१२/२००९ व २४/१२/२००९ रोजी वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले.

हे संमेलन दोन विभागात संपन्न झाले. गुरुवार दि. २४/१२/०९ रोजी इ. ५ वी, ६ वी, ७ वी चे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न झाले. याचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ अनुभवी व गुणग्राही असे सदस्य श्री. श्री. वि. करंदीकर यांनी भूषविले होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी शाळेची वाटचाल व वाढती प्रगती याचा आढावा घेतला. सुवर्ण महोत्सव व वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त झालेले सर्व कार्यक्रम अतिशय दर्जेदार होते असे कौतुकोद्गार काढले. विद्यार्थ्यांनी कलावंत, गुणवंत व यशवंत व्हावे अशी सदिच्छा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते श्री. प्रसाद पंडित. त्यांनी मुलांना दोन छान गोष्टी सांगितल्या व कौटुंबिक जीवनात आजी-आजोबांचे स्थान किती महत्त्वपूर्ण आहे हे पटवून दिले; तसेच दुसऱ्या गोष्टीतून जीवनात चांगल्या गोष्टी टिपण्याचा संदेश दिला. यशस्वी लेखक, दिग्दर्शक, कलावंताने मुलांना दिलेला हा संदेश!

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. मुख्या. सौ. उषा कळमकर यांनी केले, सूत्र संचालन सौ. सुमिता माने यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले.

प्रास्ताविकात माननीय मुख्याध्यापिका सौ. उषा कळमकर यांनी जीवनात अभ्यासाचे महत्त्व किती आहे हे पटवून दिले. विद्यार्थ्यांची ही अभ्यासू वृत्ती यशस्विता मिळवून देते असे ही सांगितले.

दगडविटांनी बांधल्या जातात त्या भिंती, पण जिव्हाळ्याने बांधले जाते ते घर.

माध्यमिक शाळेचे वार्षिक स्नेहसंमेलन दि. २३ व २४ डिसेंबर रोजी संपन्न झाले.

८ वी, ९ वी, १० वी या इयत्तांसाठी दि. २३ डिसेंबर रोजी कार्यक्रम झाला. याचे अध्यक्षस्थान विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. श्री. वि. करंदीकर यांनी भूषविले होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी वार्षिक स्नेहसंमेलन व सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित केलेल्या सर्व कार्यक्रमाबद्दल प्रशंसोद्गार काढले ते म्हणाले, 'या वर्षी आयोजित केलेले सर्व कार्यक्रम हे 'शैक्षणिक मूल्य असलेले सामाजिक कार्यक्रम व सामाजिक मूल्य असलेले शैक्षणिक कार्यक्रम होते' या बरोबर त्यांनी मुलांना जीवनात एखादी तरी कला आत्मसात करावी व त्यात प्रावीण्य मिळवून जीवनात गुणवंत, यशवंत, कलावंत व्हावे अशी सदिच्छा प्रकट केली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते श्री केदार शिंदे. त्यांनी मुलांना आपल्या शालेय आठवणी सांगून मुलांची मने काबीज केली. मार्क म्हणजे सर्वस्व नव्हेच! आपला कला आणि आपल्यातील कला ओळखा जीवनात नक्की यशस्वी व्हाल. यशस्वी लेखक, दिग्दर्शक व कलावंत अशा पाहुण्यांनी दिलेला हा संदेश!

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. मुख्या. सौ. उषा कळमकर यांनी केले, तर सूत्र संचालन सौ. सुमिता माने यांनी केले तर आभार प्रदर्शन सौ. सुनीता देशपांडे यांनी केले.

प्रास्ताविकात मा. मुख्याध्यापिका विद्यार्थ्यांना केवळ ज्ञानी होऊ नका तर विज्ञाननिष्ठ व्हा असा संदेश दिला. जीवनात ज्ञान व विज्ञान हातात हात घालून गेल्यास नक्की यशस्वी व्हाल असा संदेश दिला.

●●●

(मुखपृष्ठ २ वरून)

संपादकीय – **आत्महत्यांचा वेध**

शकतात; तर काही साधे आघातही पचवू शकत नाहीत. विशेषत: दक्षिण भारतात नटनट्या वा नेत्यांच्या निधनानंतर आत्महत्यांची लाट येते, हे आपण अनुभवले आहे. थोडक्यात, अप्रिय घटना वा अपयश पचवण्याची क्षमता नसणाऱ्या अनेक व्यक्ती असतात. यांना गरज असते ती निमित्ताची. आजच्या काळात सिनेमा, दूरदर्शन, वृत्तपत्रे यांची निमित्त म्हणून असणारी भूमिका वादातीत आहे. शिवाय आपले वेगळेपण, प्रसिद्धी मिळवण्यासाठी ही माध्यमे परिवर्तनाचा मुलामा देऊन भडक, रंजकपणे अशा घटनांचे अनिर्बंध प्रक्षेपण करतात. आव असतो तो समस्या सोडवण्याचा. या संदर्भात अलीकडील काही सिनेमांचे उदाहरण लक्षात घेता येईल. चोऱ्या, फसवणूक, दारू पिणे असे जे काही करू नये ते खुमासदारपणे, ठसठशीतपणे मांडले जाते. यांचाही समाजमनावर दुष्परिणाम होते. याबद्दल चकार शब्द उच्चारला जात नाही. याउलट समस्यांच्या नावाखाली सिनेमाची छुपी जाहिरातबाजी मात्र स्वच्छंदपणे चाललेली असते. या मागे अर्थातच मोठे 'अर्थ'कारण असते.

दुसराही महत्त्वाचा मुद्दा म्हणजे परीक्षा नाहीशा करून किंवा शिक्षणाचा दर्जा खालावून आत्महत्या कमी होतील असला भाबडा उपचार. याहीपेक्षा भयावह म्हणजे थोर विचारवंत, मानसशास्त्रज्ञ इत्यादींनी बहुतांशी पाश्चात्त्य जीवनशैलीवर आधारित निष्कर्षांची केलेली पोपटपंची होय! विद्वान समूहापुढे मांडण्याचे हे विचार अशा विषयांची माहिती नसलेल्या लोकांपर्यंत पोहचवण्याचे कार्य ही माणसे हिरीरीने करू असतात. पालक, शिक्षक, परीक्षा या घटकांपेक्षा हे सर्व घटकही आत्महत्यांना जबाबदार आहेत. पण लक्षात कोण घेतो? जीवनशैली चुकत चालली आहे, तिची दिशा सावरायला हवी.

●●●

# परिसर वार्ता

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यामिक विभाग

➢ बालदिनानिमित्त दि. १३ व १४ नोव्हेंबर रोजी आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिकृती विद्यालंकार सभागृहात मांडण्यात आली. प्रदर्शनासोबत विमानतळाच्या १४ विभागांची माहिती, कार्य, त्यांचे महत्त्व इ. विषयांवर सविस्तर माहिती दिली गेली.

➢ शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त दि. १६, १८, १९ व २० सप्टें. रोजी अनुक्रमे कॅनव्हास रांगोळी स्पर्धा, वारली चित्रकला, मुद्राचित्र व कागदकाम, कागदाच्या लगद्यापासून वस्तू बनविणे इ. कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले.

➢ पीपल्स एज्युकेशन सोसा. इंग्रजी माध्यम शाळा (ठाणे) रौप्य महोत्सवीवर्षानिमित्त आयोजित आंतरशालेय स्पर्धेत खालील विद्यार्थ्यांनी यश प्राप्त केले.

| | | |
|---|---|---|
| मराठी वक्तृत्व स्पर्धा | प्रणिता काळभोर (७अ) | प्रथम क्रमांक |
| | अक्षया पाटील (७ब) | उत्तेजनार्थ |
| संपूर्ण रामरक्षा पठण | ऋचा सवडकर (१०क) | द्वितीय क्रमांक |
| हिंदी वक्तृत्व स्पर्धा | स्नेहल पाटील (७ड) | द्वितीय क्रमांक |
| | पराग जाधव (८ड) | प्रशस्तिपत्र |
| | प्रेम चिंदरकर (८ ड) | प्रशस्तिपत्र |

➢ 'नेहरू सायन्स सेंटर मुंबई' तर्फे आयोजित आंतरशालेय विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धेत प्रफुल्ल खेडेकर, मृण्मय कोथळे, प्रज्ञेश सरवणकर व मिहिर गाडगीळ यांच्या गटास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

➢ न्यू इंग्लिश स्कूल, सोनाळा, ता. वाडा, जि. ठाणे येथे दि. ७ नोव्हें. रोजी झालेल्या जिल्हा स्तरीय 'राष्ट्रीय बाल विज्ञान परिषदेत' इ. ९ वी च्या विद्यार्थीनींनी 'जलावरण' हा प्रकल्प सादर केला.

➢ शनिवार दि. २१ नोव्हेंबर रोजी इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी श्री. प्रवीण जोशी यांचे 'हसत-खेळत बँकींग' ह्या विषयावर व्याख्यान आयोजित केले गेले.

➢ इयत्ता १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी समाजशास्त्र विषयाची कार्यशाळा श्री. जुन्नरकर सरांच्या उपस्थितीत दि. ३० नोव्हें. व १ डिसें. रोजी विद्यालंकार हॉलमध्ये घेण्यात आली.

➢ 'न्यायिक लढा पत्रकार सेवा संस्था' आयोजित जगातील पहिले बाल साहित्य संमेलन १५ नोव्हें. २००९ रोजी एन्. के. टी. सभागृह ठाणे येथे संपन्न झाले. संमेलनातील परिसंवाद, वृक्षदिंडी व सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्तम सहभाग घेतला.

➢ शाळेच्या सुवर्णमहोत्सवी वर्षानिमित्त सोमवार दि. २३ नोव्हेंबर रोजी गडकरी रंगायतनमध्ये श्री. विजय जामसंडेकर लिखित 'प्रत्येकाचं आभाळ वेगळं' हा भावसंवाद शिक्षक व पालकांसाठी आयोजित केला गेला.

➢ १२ सप्टें. रोजी घेण्यात आलेल्या डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक लेखी परीक्षेत २५ पैकी १६ विद्यार्थ्यांची प्रमाणपत्र व ६ विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षेसाठी निवड झाली.

➢ पीपल्स एज्यूकेशन सोसायटीज् इंग्लिश मिडिअम स्कूल व ज्यूनिअर कॉलेज, ठाणे यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित खो-खो स्पर्धेत १४ व १७ वर्षाखालील मुलींचे दोन्ही गट उपविजयी ठरले.

➢ तसेच यानिमित्त आयोजित 'Identifying learning

disabilities among students' या कार्यशाळेस २१ नोव्हेंबर रोजी सौ. संध्या झंझाड व सौ. संगिता तातळे उपस्थित होत्या.

➢ २६ नोव्हेंबर '०८ च्या आतंकवादी हल्ल्यात शहीद झालेल्या हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून 'प्रहार' वृत्तपत्र आयोजित स्मृतियात्रेत इ. ७ वी ते १० चे विद्यार्थी सहभागी झाले.

**सुवर्णमहोत्सवानिमित्त आयोजित स्पर्धा व कार्यशाळा :**

➢ क्रीडामहोत्सवात ९ वी १० वी साठी डॉचबॉल व व्हॉलीबॉल स्पर्धांचे आयोजन.

➢ वारली चित्र शैलीची कार्यशाळा ६, ७ व ९ वी साठी सौ. अनुराधा एकतारे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आली. सौ. वसुधा जोशी यांनी 'मुखवटा आणि हस्तमुद्रा' या विषयीची कार्यशाळा ६ वी ते ९ वी च्या विद्यार्थ्यांसाठी उत्कृष्टपणे घेतली.



**हस्तमुद्रा व मुखवटा यांची कार्यशाळा – सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेतील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद**

➢ पर्यावरण दक्षता मंच, ठाणे शाळेच्या शिक्षिका सौ. योगिता सावंत व श्री. अमोल चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली कागदाच्या लगद्यापासून वस्तू तयार करण्याची कार्यशाळा घेण्यात आली.



**मुखवट्यांची कार्यशाळा घेताना विद्यार्थ्यांनी दिलेला प्रतिसाद**

➢ ९ वी व १० वी च्या सर्व पालकांसाठी 'आपल्या पाल्याच्या पुढील आयुष्यासाठीच्या ध्येय आणि दिशा' यांची विविधता या विषयीचे दृक्‌श्राव्य माध्यमातून मार्गदर्शन मा. डॉ. प्रसाद कर्णिक आणि त्यांचे सहकारी यांनी केले.

➢ आंतरशालेय स्पर्धा – गीतगायन, चित्रकला, पुष्परचना, एकेरी नृत्य व प्रकल्प सादरीकरण स्पर्धा या सर्व स्पर्धांत ठाण्यातील नामांकित शाळांनी सहभाग घेतला. त्यातील चित्रकला स्पर्धेत द्वितीय, पुष्परचना स्पर्धेत प्रथम व द्वितीय, एकेरी नृत्य स्पर्धेत प्रथम व प्रकल्प सादरीकरणात प्रथम क्रमांक पटकावून शाळेने आपली गुणवत्ता सर्वांसमोर सिद्ध केली.

➢ 'राष्ट्रीय हरितसेना योजना' आयोजित उपक्रमांतर्गत ६ वी ते ८ वी च्या विद्यार्थ्यांनी उन्हाळ्याच्या सुट्टीत बिया गोळा करून त्यांची तयार केलेली रोपे पर्यावरण शाळेला भेट म्हणून देण्यात आली.

➢ 'रामकृष्ण मठा' तर्फे घेण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेत स्नेहल पाटील व प्रणिता काळभोर यांना अनुक्रमे प्रथम व द्वितीय पारितोषिक प्राप्त झाले व १२ डिसें. रोजी झालेल्या चॅम्पीयन ट्रॉफीसाठी स्नेहल पाटील (७ ड) हिची निवड झाली.

➢ १४ व १५ नोव्हें. रोजी 'कराटे बुडोकोन फेडरेशन ऑफ इंडिया' तर्फे घेण्यात आलेल्य अकरावी KBI नॅशनल कराटे चॅम्पियनशीप २००९' स्पर्धेत अंकीता दुधे (७ ब) हिने 'कुमिथे' प्रकारात रौप्य पदक प्राप्त केले. सदर स्पर्धा 'त्रिचूर-केरळ' येथे पार पडली.

➢ संस्कृत भाषा प्रसारिणी सभेचे सुर-वाणी-ज्ञान मंदिर आयोजित स्तोत्र पठण स्पर्धेत ईशानी भावे हिला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक प्राप्त झाले.

➢ मुंबईवर २६/११ रोजी झालेल्या दहशतवाद्यांच्या हल्ल्यात शहीद झालेल्या जवानांना श्रद्धांजली वाहण्यासाठी आझाद मैदानावर आयोजित आंतरशालेय '२६/११ मुंबई हिरोज् ट्रॉफी' या क्रिकेट स्पर्धेत शाळेने दणदणीत विजय संपादित केला.

➢ १ डिसे. या जागतिक एडस् दिनाच्या निमित्ताने मा. जिल्हा शल्यचिकित्सक विभाग, सिव्हिल हॉस्पिटल, ठाणे व युनिसेफ यांनी आयोजित केलेल्या रॅलीत इ. ९ वी चे विद्यार्थी सहभागी झाले.

**सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित उपक्रम अहवाल :**

➢ **क्रमांक १ - वाचेल तो वाचेल :**

शिक्षकांनी वाचलेल्या एका पुस्तकाचे परीक्षण जुलै महिन्यापासून प्रत्येक शनिवारी एका शिक्षकाने विद्यार्थ्यांपुढे वाचून दाखवले.

➢ **क्रमांक २ - जीवनविज्ञान :**

८ वी अ, ब च्या विद्यार्थ्यांसाठी जीवनविज्ञान शिकविणारा कार्यक्रम आयोजित केला. (दि. १५ जून)

➢ **क्रमांक ३ - नागरीसंरक्षण आणि आम्ही :**

दि. १६ ते २० जून या कालावधीत शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना नागरी संरक्षणाचे प्रशिक्षण देण्यात आले. यात १९ जणांना प्रावीण्य श्रेणी, २३ जणांना प्रथम श्रेणी मिळाली.

➢ **क्रमांक ४ - सफर है सुहाना :**

माजी विद्यार्थी अमेय गोखले याने 'विश्वाची सफर' हा खगोलशास्त्रावरील कार्यक्रम दृक्-श्राव्य माध्यमातून सादर केला.

➢ **क्रमांक ५ - प्रयत्नांती परमेश्वर :**

प्रज्ञावंत माजी विद्यार्थी भूषण तासकर याने इ. १० वीचा अभ्यास कसा करावा याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले.

➢ **क्रमांक ६ - स्मरण महामानवाचे :**

डॉ. प्रकाश आमटे व सौ. मंदा आमटे यांचा 'हेमलकसा लोकबिरादरी प्रकल्प' याची माहिती 'आनंदवन स्नेही मंडळ' या संस्थेतर्फे दृक्-श्राव्य माध्यमातून देण्यात आली.

➢ **क्रमांक ७ - रंग उमलत्या मनाचे :**

दि. १५ ते १७ जुलै या कालावधीत IPH मार्फत व जिज्ञासा तर्फे कुमारवयीन विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी जीवन शिक्षण उपक्रम राबविण्यात आला.

➢ **क्रमांक ८ - पन्नास, पचास, फिफ्टी :**

इ. ५ वी च्या विद्यार्थ्यांसाठी ५० विविध घोषवाक्ये, ५० सुविचार, ५० म्हणी, ५० मराठी गाण्यांची धृपदे, ५० देशांची नावे असे विषय देऊन स्पर्धा घेण्यात आली.

➢ **क्रमांक ९ - ग्राहक राजा :**

ग्राहक पंचायत, ग्राहक जागृती शिक्षण मंडळातर्फे इ. ८ वी ब च्या विद्यार्थ्यांसाठी 'ग्राहक'या विषयावर दर

बुधवारी ७ वी तासिका व्याख्यानासाठी ठेवण्यात आली आहे.

➢ **क्रमांक १० – कसा करावा अभ्यास :**

ग्रोथ सेंटर चेंबूर तर्फे ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी अभ्यासातील अडचणी Mrder Method पद्धतीने समुदेशन करून कशा सोडवाव्यात याबाबत मार्गदर्शन केले.

➢ **क्रमांक ११ – प्रेमाच्या गावा जावे :**

संयुक्त राष्ट्र माहिती केंद्र व रामकृष्ण मिशन यांच्यातर्फे आयोजित अखिल भारतीय निबंध लेखन स्पर्धा इ. ६ वी ते १० वी साठी आयोजित केली होती. विषय – 'प्रेम द्या प्रेम मिळवा.'

➢ **क्रमांक १२ – सर्वांगीण गुणवत्ता विकास :**

दि. २८ जुलै रोजी OHP च्या साहाय्याने श्री. राजीव वर्तक यांनी अध्ययन अध्यापन प्रक्रियेचे प्रात्यक्षिक दाखवले.

➢ **क्रमांक १३ – श्रावणमासी हर्ष मानसी :**

३१ जुलै रोजी श्रावण शुक्रवारचे औचित्य साधून दीपपूजन, श्रावण मास महत्त्व त्यापाठीमागचे विज्ञान, श्रावणावर आधारित काव्य लेखन स्पर्धा असे कार्यक्रम आयोजित केले.

➢ **क्रमांक १४ – आनंदाचे डोही :**

९ वीच्या सर्व विद्यार्थ्यांसाठी १ व २ सप्टें. रोजी ९ वीच्या पाठ्यपुस्तकातील काव्यांचा रसास्वाद हा कार्यक्रम घेण्यात आला.

➢ **क्रमांक १५ – हार्मोनियम एक रसास्वाद :**

दि. ९ सप्टें. रोजी डॉ. विद्याधर ओक त्यांचे सुपुत्र आदित्य व आनंद ओक यांच्या हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम झाला.

➢ **क्रमांक १६ – हिरवा निसर्ग हा भवतीने :**

इ. ५ वी ते १० वी च्या विद्यार्थ्यांसाठी निसर्गगीत पाठांतर स्पर्धा दि. १६ सप्टें. रोजी आयोजित करण्यात आली होती.

➢ **क्रमांक १७ – भोंडला :**

दि. २२ सप्टेंबर रोजी इ. ५ वी, ६ वी च्या विद्यार्थीनींसाठी भोंडला उत्साहात साजरा झाला. सौ. सुमेधा बेडेकर जातीने उपस्थित होत्या.

➢ **क्रमांक १८ – तन ताजे मन ताजे :**

दि. ३० सप्टेंबर रोजी Art of living शिबिराचे सर्व शिक्षकांसाठी आयोजन करण्यात आले.

➢ **क्रमांक १९ – Sky is the Limit :**

अस्त्रविध सर्व्हिसेस तर्फे इ. १० वीच्या पालकांसाठी पाल्याच्या शिक्षणासंबंधीच्या 'विविध संधी' याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

➢ **क्रमांक २० – चित्रकला स्पर्धा :**

दि. ४ नोव्हेंबर रोजी ही स्पर्धा घेण्यात आली.

➢ **क्रमांक २१ – बालदिन :**

आंतरराष्ट्रीय विमानतळाची प्रतिकृती याचे प्रदर्शन भरविण्यात आले.

➢ **क्रमांक २२ – आंतरशालेय स्पर्धा :**

१. गीतगायन, २. चित्रकला, ३. पुष्परचना, ४. नृत्यस्पर्धा, ५. प्रकल्प सादरीकरण घेण्यात आल्या.

➢ **क्रमांक २३ – :**

वारली चित्रशैली कार्यशाळा, मार्गदर्शन सौ. अनुराधा एकतारे. इ. ६ वी, ७ वी व ८ वी.



वारली चित्रकला कार्यशाळा घेताना सौ. अनुराधा एकतारे



वारली चित्रकला कार्यशाळा विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

➢ **क्रमांक २४ – :**

मुखवटा आणि हस्तमुद्रा कार्यशाळा मार्गदर्शन सौ. वसुधा जोशी. इ. ६ वी ते ९ वी.

➢ **क्रमांक २५ – :**

कागद्याच्या लगद्यापासून वस्तू बनवणे. मार्गदर्शन सौ. सावंत, श्री. चव्हाण. इ. ६ वी ते ९ वी.

➢ **क्रमांक २६ – हसत खेळत बँकिंग :**

इ. ८ वीच्या विद्यार्थ्यांसाठी बँकेचे व्यवहार कसे करावेत याचे मार्गदर्शन श्री. प्रवीण जोशी यांनी केले.

➢ **क्रमांक २७ – हस्ताक्षर स्पर्धा :**

इ. ९ वी, १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मराठी व इंग्रजी हस्ताक्षर स्पर्धा घेण्यात आली.

➢ **क्रमांक २८ – प्रत्येकाचं आभाळ वेगळं :**

श्री. विजय जामसंडेकर यांनी पालकांशी भावसंवाद साधला. (दि. २३ नोव्हेंबर – गडकरी रंगायतन.)

➢ **क्रमांक २९ – आवाज की दुनिया :**

इ. ९ वी १० वीसाठी विविध प्रकारचे आवाज व मान्यवरांच्या नकला करणे अशी स्पर्धा दि. २४ नोव्हें. रोजी घेण्यात आली.

➢ **क्रमांक ३० – खेल खेलमें :**

दि. २७ नोव्हें. रोजी इ. ९ वी १०वी च्या मुलांसाठी व्हॉलीबॉल व मुलींसाठी डॉजबॉल या स्पर्धा घेण्यात आल्या.

➢ **क्रमांक ३१ – जरा याद करा कुर्बानी :**

दि. २६ नोव्हेंबर रोजी आतंकवादी हल्ल्यातील हुतात्म्यांना श्रद्धांजली म्हणून स्मृतियात्रा काढण्यात आली. इ. ७ वी ते १० वीचे विद्यार्थी व शिक्षक सहभागी झाले.

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी माध्यम शाळा

**माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा निकाल :**

माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत आमच्या शाळेतील ५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली होती. पुर्नतपासणीनंतर कु. नेहा पुसाळकर हिला शहरी विभागात २२ वा क्रमांक मिळवून शिष्यवृत्ती मिळाली.

**IPM २००९ गणित परीक्षेचा निकाल :**

| इ. | ५ वी | ६ वी | ७ वी | ८ वी |
|---|---|---|---|---|
| एकूण विद्यार्थी संख्या | १७ | १२ | ५ | ४ |
| विशेष प्रावीण्य | ६ | ० | ० | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रथम श्रेणी | ५ | २ | २ | ३ |
| द्वितीय श्रेणी | ४ | २ | १ | ० |
| उत्तीर्ण श्रेणी | १ | ३ | १ | ० |
| अनुत्तीर्ण | १ | ४ | १ | ० |

**प्रावीण्य प्रमाणपत्र मिळवलेल्या विद्यार्थ्यांची नावे:**

| इयत्ता | नाव | गुण | क्रमांक |
|---|---|---|---|
| इ. ५ वी | कु. तक्ष सत्रा | ९० | १९ |
| इ. ५ वी | कु. अमोघ गोखले | ८० | २८४ |
| इ. ५ वी | कु. चैतन्य केळकर | ९० | २८९ |
| इ. ५ वी | कु. वेदांत साळुंके | ८० | ३१२ |
| इ. ६ वी | कु. सन्मय अघारकर | ७२ | ५७ |

**बाळू बाकरे संगीत स्पर्धेचा निकाल :**

संगीत - कु. एकलव्य अमृते - प्रथम क्रमांक

संवादिनी - कु. अमित पाटणकर - प्रथम क्रमांक

तबला - कु. रोहित देव - प्रथम क्रमांक

## विधी महाविद्यालय

➢ राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी आयोजित केलेल्या दोन दिवसीय ''मानवीय हक्क'' या चर्चासत्रात प्राध्यापक विनोद वाघ यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केले. दि. ७ व ८ नोव्हेंबर या दोन दिवसीय शिबीरात देशभरातील अनेक मान्यवरांनी मानवीय हक्कांच्या विविध पैलूंवर चर्चा केली.

➢ के. सी. विधी महाविद्यालय, मुंबई यांनी दिनांक १ ऑक्टोबर रोजी आयोजित केलेल्या Atternative Dispute Resolution या एक दिवसीय कार्यशाळेमध्ये विद्या प्रसारक मंडळाच्या ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालयाचे प्राध्यापक विनोद वाघ व दहा विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. दिवसभर चाललेल्या या चर्चासत्रात अनेक मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

➢ राहटोली, बदलापूर येथे ठाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांनी दिनांक २२ नोव्हेंबर रोजी आयोजित केलेल्या तंटामुक्त गाव योजनेअंतर्गत विधी शिबीरात विधी महाविद्यालयाचे विद्यार्थी सहभागी झाले.

➢ पुणे विद्यापीठाच्या विधी विभागातर्फे दिनांक २३ व २४ नोव्हेंबर रोजी 'Legal Research an interdisciplainary approach' या विषयावरील चर्चासत्रास महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या सौ. श्रीविद्या जयाकुमार उपस्थित राहिल्या होत्या.

## वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन

**वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनतर्फे 'उत्पादन नफा, शांतता व सुव्यवस्था वाढविण्यासाठी सुरक्षिततेच्या उपाय योजना' या नवव्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन :**

विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे हे १९८३ सालापासून आपल्या तांत्रिक शिक्षणास सुरुवात केली. जागतिक शैक्षणिक, तांत्रिक, सामाजिक घडामोडी व त्यात सातत्याने होणारे बदल याचा मेळ घालत संस्थेने बदल्या घडामोडींची (ज्ञानाची) जाणीव ठेवून घडणारे बदल हे आपल्या विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावेत किंवा त्या ज्ञानाची जाणीव व्हावी यादृष्टीने संस्था राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करीत आलेली आहे. परिषदेद्वारे अनेक अनुभवी तज्ज्ञ व्यक्तीकडून मार्गदर्शन केले जाते. शिवाय विद्यार्थ्यांनाही आपले विचार प्रगट करण्याचे व्यासपीठ तयार होते. अशा विचारातून ज्ञानाचे आदानप्रदान होते, ज्ञानवृद्धी होते.

तंत्रनिकेतनतर्फे 'उत्पादन नफा, शांतता व सुव्यवस्था वाढविण्यासाठी सुरक्षिततेच्या उपाय योजना' या विषयावर नवव्या एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात

आले होते. ही परिषद शनिवार दि. १० ऑक्टोबर रोजी थोरले बाजीराव पेशवे सभागृह, महाविद्यालय परिसर, ठाणे येथे पार पडली. सदर परिषदेस टाटा पॉवर आणि आयटीडी सीमेंन्टेशन या संस्थांचे अर्थसहाय्य लाभले.

डॉ. अविनाश पाटकर (टाटा पॉवर) हे प्रमुख पाहुणे म्हणून परिषदेस उपस्थित होते. या वेळी त्यांनी ''उच्च विद्युत क्षमतेचे परिषण व त्या संदर्भातील सुरक्षिततेच्या उपाय योजना'' ह्या संदर्भातील माहिती चित्रफितीद्वारे उपस्थितांना करून दिली. तसेच दुसरे सन्माननीय पाहुणे श्री. हरीहरन (व्हाईस प्रेसिडन्ट, सिनजेन्टा) यांनी ''शेती उपयोगी रसायनांचे उत्पादन, उपयोग व वितरण या प्रक्रियांच्या सुरक्षिततेच्या उपाय योजना'' या विषयावर प्रमुख भाषण केले. सदर परिषदेस औद्योगिक क्षेत्रातील अनेक मान्यवर, सबंधित विषयातील जाणकार व उद्योजक इत्यादी उपस्थित होते. विद्या प्रसारक मंडळाचे ज्येष्ठ सदस्य श्री. करंदीकर हे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. त्यांनी संस्था करीत असलेल्या प्रगती संबधीचे विचार प्रकट केले व भविष्यात संस्थेची उत्तरोत्तर प्रगती होत जावी अशी सदिच्छा व्यक्त केली व सुरक्षिततेच्या जाणीवेसंबंधीचे विचार मांडले.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी आपले मनोगत व्यक्त करून परिषदेमागची भूमिका विषद केली. सदर परिषद दोन सत्रांत पार पडली. सकाळच्या सत्रात तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभले व दुपारच्या सत्रात सुरक्षिते संदर्भातील शोधनिबंधाचे सादरीकरण करण्यात आले.

उत्पादन, नफा, शांतता व सुव्यवस्था वाढविण्यासाठी सुरक्षिततेच्या उपाय योजना या विषयाची चर्चा घडवून आणण्यामागे तंत्रनिकेतनचा उद्देश असा आहे की, औद्यागिक क्षेत्रात सुरक्षिततेच्या उपाययोजना नीट न राबविल्याने दिवसेंदिवस मनुष्यहानी व वित्तहानी या सारख्या गोष्टींना तोंड द्यावे लागते. अशा अपघातांच्या वाढत्या प्रमाणामुळे नफा, शांतता व सुव्यवस्था इत्यादींवर दुष्परिणाम घडून येतो. अपघातांचे प्रमाण नियंत्रित करण्यासाठी सुरक्षिततेच्या उपाय योजना औद्योगिक क्षेत्रात राबविल्या जातात. त्यांची माहिती व्हावी हा ही परिषद आयोजित करण्यामागील प्रमुख उद्देश होता.

सदर परिषदेस श्री. ए. के. सेहगल (सिनियर व्हाईस प्रेसिडेन्ट आयटीडी सीमेंन्टेशन), डॉ. डी. डी. काळे (यु. आय. सी. टी., मुंबई), श्री. मनिष गाला (डायरेक्टर सिग्मा असोसिएटस्), श्री. निलेश गोरे (डेप्युटी मॅनेजर, स्पेशालीटी मोलीक्युल लि.), डॉ. सी. शहा (टेक्नीकल डायरेक्टर मेकेस्को ग्रुप), श्री. एस. भंगावकर (मॅनेजर, टाटा पॉवर), श्री. पी. एम. जोशी (सेफ्टी मॅनेजर, कबोट इंडिया), श्री. डी. बी. कांबळे (चीफ प्रोसेस मॅनेजर, बी.पी.सी.एल लि.) इत्यादींनी आपल्या शोधनिबंधांतून विविध व्यवसायिक क्षेत्रांमध्ये सुरक्षा कशी आमलात आणता येईल याची माहिती दिली. तंत्रनिकेतनतर्फे मान्यवरांच्या हस्ते भेट वस्तू देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

सदर परिषदेदरम्यान मान्यवरांच्या शुभहस्ते एका स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. या स्मरणिकेत संबंधित विषयावरील शोधनिबंधांचा समावेश करण्यात आला आहे.

प्रोफेसर व्ही. एस. भाकरे (सहाय्यक समन्वयक), सौ. स्मिता खंडागळे (संघटन सचिव) व सौ. रुपाली काणे यांनी ही परिषद आयोजित करण्यात महत्त्वाची भूमिका पार पाडली. परिषदेची सांगता सौ. स्वाती जोशी यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली.

**मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे उद्‌घाटन :**

विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनच्या मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे उद्‌घाटन गुरुवार दि. २६ नोव्हेंबर

रोजी विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांचे शुभहस्ते करण्यात आले. सुसज्ज व उपयुक्त साधनांनी युक्त अशा प्रयोगशाळा, वर्गखोल्या, स्टाफसाठी केबिन्स इत्यादींचा त्यात समावेश आहे.

कार्यक्रमाची सुरुवात २६/११ च्या दहशतवादी हल्ल्यात बळी पडलेल्या जवानांना श्रद्धांजली अर्पित करून व सरस्वती वंदनाने करण्यात आली.

विद्या प्रसारक मंडळाचे, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक यांनी उपस्थितांचे स्वागत करून आपल्या स्वागतपर भाषणात तंत्रनिकेतन करीत असलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. तुषार मोहीते-पाटील व त्यांच्या स्टाफने केलेल्या कार्याबद्दल त्यांनी गौरवोद्गार काढले. शिवाय मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या राष्ट्रीय परिषदे दरम्यान घेतलेल्या मेहनतीचाही उल्लेख केला. व्यवस्थापनाकडून मिळत असलेल्या सहकार्याबद्दल प्राचार्य दि. कृ. नायक यांनी आभार व्यक्त केले व पुढील कार्यासाठी मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाकडून अधिक-अधिक प्रगती होवो अशी सदिच्छा व्यक्त केली.

कार्यक्रमाचे प्रमुख डॉ. विजय बेडेकर यांचे प्रमुख भाषण झाले. वैद्यकीय क्षेत्रात उत्तम साधनांचे महत्त्व त्यांनी उपस्थितांनी सांगितले. एका चांगल्या व सुसज्ज व सोयी साधनांनी युक्त विभागाची स्थापना झाल्याचे गौरवोद्गार काढले. या क्षेत्रातल्या करिअरची माहिती व्हावी यासाठी जनतेमध्ये जागरूकता निर्माण करून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास वाढविणे आवश्यक आहे. शिवाय ज्ञान मिळविण्यासाठी अनेक सुविधा निर्माण झाल्या आहेत. माहिती तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेट सारख्या सुविधेमुळे ज्ञान प्रसारणाचे कार्य अत्यंत जलद होण्यास मदत झाली असल्याचे त्यांनी नमूद केले.



**मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाच्या उद्घाटन प्रसंगी फीत कापताना - मध्यभागी डॉ. विजय बेडेकर (कार्याध्यक्ष वि.प्र.मंडळ, ठाणे) डावीकडून प्राचार्य दि. कृ. नायक, पानसरे मॅडम, उजवीकडे मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभाग प्रमुख प्रा. तुषार मोहिते-पाटील व इतर सहकारी**

'सर्वोत्तम तंत्रनिकेतन'चा नरसी मोनजी पुरस्कार विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनला प्राप्त झाल्याबद्दल डॉ. विजय बेडेकर यांनी प्राचार्य दि. कृ. नायक यांचे अभिनंदन केले. शिवाय मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाची सर्वोत्तम प्रगती व चांगले गुण प्राप्त होवो अशी सदिच्छा व्यक्त केली.

सदर कार्यक्रमास कॉलेज कॅम्पस्‌मधील सर्व प्राचार्य, तंत्रनिकेतनचे प्राचार्य दि. कृ. नायक, मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. तुषार मोहिते-पाटील तंत्रनिकेतन मधील सर्व विभाग प्रमुख, चंदूभाई ठक्कर, आर्किटेक्ट प्रिती पानसरे, शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

शेवटी मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. तुषार मोहिते-पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले.

**तंत्रनिकेतनला ISTE चा नरसी मोनजी पुरस्कार :**

सन १९८३ साली विद्या प्रसारक मंडळाचे,

तंत्रनिकेतनची स्थापना झाली. तंत्रनिकेतनने नुकतेच रौप्य महोत्सवी वर्ष साजरे केले आहे. तीन वर्षीय सात पदविका अभ्यासक्रमांच्या तांत्रिक शिक्षणाची सुविधा तंत्रनिकेतनात असून उत्तम नेतृत्व, पालक संस्थेकडून सदैव प्रोत्साहन, क्वालिफाईड स्टाफ, सुसज्ज प्रयोगशाळा, माहिती तंत्रज्ञानाने युक्त असा WI-FI परिसर, संगणकीकरण युक्त ग्रंथालय आणि माहिती केंद्र, तांत्रिक शिक्षणाची गुणात्मक खात्री असणारे संस्थेचे व्हीजन व उज्ज्वल निकालाची परंपरा व २००४ साली नॅशनल बोर्ड ऑफ ॲक्रीडिटेशन (NBA) नवी दिल्ली याजकडून मूल्यांकन अशी तंत्रनिकेतनची अनेक ठळक वैशिष्ट्ये सांगता येतील. शिवाय तंत्रनिकेतन दरवर्षी महत्त्वाच्या व जागतिक घडामोडींवर आधारित व बदलत्या ज्ञानाचा प्रसार व्हावा व ते समाजापर्यंत पोहचवावे ह्या सामाजिक हेतूने राष्ट्रीय परिसंवादाचे आयोजन करीत असते.

नुकतेच सन २००९ मध्ये तंत्रनिकेतनने केलेल्या उल्लेखनीय उपक्रमासाठीचा 'इंडियन सोसायटी फॉर टेक्नीकल एज्युकेशन' (ISTE) चा राष्ट्रीय स्तरावरील ISTE - Narsee-Monsee Award for Best over all performance for the polytechnic in Maharashtra state for the year 2009. व The Best chapter of ISTE Maharashtra & Goa section on the basis of activities carried out during the year 2009. हे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. शिवाय ISTE - Narsee-Monjee Best Award for project work done by polytechinc students in Maharashtra state चा पुरस्कार तंत्रनिकेतनमधील विद्यार्थ्यांनी 'ऊर्जा संवर्धन' या विषयावर केलेल्या प्रकल्पाला प्राप्त झाला आहे. गौरव महाशब्दे, तेजस मालवणकर, सिद्धेश तरे व अनिरूद्ध पाटील या विद्यार्थ्यांना पुरस्कार प्राप्त झाल्याने मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देवून गौरविण्यात आले.

कर्नाटक राज्यातील सुरतकल येथे 'नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नालॉजी' येथे १८ डिसेंबर रोजी ISTE च्या ३९ व्या वार्षिक सोहळ्यात हा पुरस्कार वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनला प्रदान करण्यात आला. तंत्रनिकेतनच्या वतीने प्राचार्य दि. कृ. नायक आणि प्रा. सौ. जी. एस. इंगवले यांनी मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारले.

ISTE ही राष्ट्रीय स्तरावरील व्यवसायिक संस्था असून त्याची सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० अन्वये नोंदणी झाली आहे. उद्योग आणि अन्य क्षेत्राच्या प्रगतीसाठी आवश्यक असलेले इंजिनिअरिंग आणि तंत्रज्ञान विषयातील शिक्षण प्रभावी करण्यासाठी प्रयत्नशील असलेली देशातील ही एकमेव संस्था आहे. ही संस्था दरवर्षी उल्लेखनीय काम करणाऱ्या तंत्रनिकेतनला आणि अभियांत्रिकी महाविद्यालयाला पुरस्कार देते.

विद्या प्रसारक मंडळाच्या, तंत्रनिकेतनला हा पुरस्कार प्राप्त झाल्याने राष्ट्रीय स्तरावर तंत्रनिकेतनने केलेल्या कार्याची नोंद झाल्याचे सिद्ध झाले आहे व तंत्रनिकेतनच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

राष्ट्रीय स्तरावरील प्रतिष्ठित पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल विद्या प्रसारक मंडळाचे विश्वस्त आणि व्यवस्थापन मंडळ यांचेकडूनही शनिवार दि. २८ नोव्हेंबर रोजी प्राचार्य दि. कृ. नायक यांचा पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

तंत्रनिकेतन वृत्त संकलन
**श्री. चंद्रकांत शिंगाडे**
वि.प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतन, ठाणे

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**२५४२६२७०**



# स्वप्न साकारत आहे...

*हे स्वप्न नव्हे एका व्यक्तीचे ! ते आहे समाजातील विचारवंतांचे,*
*हे स्वप्न नव्हे महंमदी मनोऱ्याचे, ते आहे श्रमिक योजनांचे*
*हे स्वप्न नव्हे खुशालवंतांचे, नव्हे ते आरामितांचे*
*नसे ते फावल्या क्षणांचे, गुलजार गादीत विसावतांचे*
*ते असे अहर्निश श्रमांचे, तसे ते असे श्रमोपासकांचे,*
*सदा ध्येयध्यासीं मग्न त्यांचे !*
*हे स्वप्न नव्हे व्यक्तिवैभवाचे, नसे ते आत्मगौरवाचे,*
*ते असे समाजोन्नतीचे, असे ते युवागौरवाचे*
*हे स्वप्न न दिसे एका क्षणीं, न एका दिनीं,*
*न एके यामिनी*
*दिनरात्र मानसी स्फुरे, सतत निद्रानाशही तें करी !*
*हे स्वप्न नसे सानुले, नसे ते चौकटी बांधिले*
*ते असे, भव्यता जयाची महान, सीमा जयाची अस्मान !*
*हे स्वप्न जसे आमुचे, असावे तसे उपस्थितांचे,*
*मुदित मनीं सुस्वागत अपुलें करितां*
*स्वप्न दिसे साकारले*
*आणि हे स्वप्न कसे आहे ते पहा -*
*ओसाड भूमी कर्दमीं जिथे घाण*
*द्वीप साजिरे आज तेथे दृश्यमान*
*ज्ञानसूर्य येथे उगवला, अज्ञान अंधार लोपला,*
*दिनरात्र प्रकाश अर्पी, अस्त न जया कल्पिला.*
*भव्य वास्तू इथे साकारती, दृश्य जयाचें महान,*
*शिल्पही जयांचे विशेषज्ञान देखिती*
*मनी जे सुजाण,*

*दृश्य देखतां जाणवे भव्यता, प्रासाद जणूं सरस्वतीचा,*
*ज्ञानवीणा जिथे झंकारे सदासर्वदा,*
*बगीचे जिथे बहरती फुलाफुलांचे रंगरंगती,*
*उद्यानीं बहरती ताटवे, कारंजी जिथे फवारती.*
*युवायुवतींचे मग्न घोळके, स्वप्न रंगवितां मग्न जे मानसी*
*स्वप्न तयांचे आकार घेई, अनुरागप्रारंभ येथेच होई*
*आचार्य आणि प्राचार्य, सदा इथें रंगती*
*विज्ञानसत्रीं सदा जयांची वाहिली मती,*
*कलावंत, सरस्वतीचे तन्मणी, तसे वैज्ञानिक महान्,*
*इथे जन्मती प्रतिभा जयांची देदीप्यमान*
*भूदल-सागर-सैनिक, वायुपुत्रही इथे निर्मिती*
*शक्तियुक्ति जयांची भारतमातेप्रती*
*नवमानव, नवनागरिक, प्रयत्नीं इथे घडतसे*
*सत्य, शिव, सुंदर जयांचे अणुरेणीं वसे.*
*बालके तव शिशुमंदिरी दाखल होतां,*
*विद्यामंदिरी दौड तयाची न रोखितां*
*नवयुवक हा प्रवेशितां विद्येचे महाद्वार*
*स्वप्न आमुचे तयाभोवती होई साकार*
*नवयुवक हा भारतभूचा सुपुत्र व्हावा,*
*बुद्धि जयाची, शक्ति जयाची भारतभूचा ठेवा*

*- डॉ. वा. ना. बेडेकर*

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**


# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- *अत्याधुनिक दृक्‌श्राव्य यंत्रणा*
- *वातानुकूलित प्रसन्न वातावरण*
- *वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा*

*अशा सुविधांनी युक्त*

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत, ३ रा मजला | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि.प्र.मं.चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

## संपर्क

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे – ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक – २५४२६२७०


हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे-४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे – ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.